दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक ११ । मंगळवार २० ऑक्टोबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा...
आदित्य रिन्यूएबल एनर्जी
रु. ७८,००० अनुदान सोबत कमी व्याजदराने कर्ज सुविधा !!!
पीएम सूर्यघर योजने अंतर्गत ३ kW सोलर रूफटॉप प्रोजेक्ट
अनुभव हीच आमची खात्री
दसरा सणानिमित्त आदित्य रिन्यूएबल एनर्जी कडून खास ऑफर
दसऱ्याच्या दिवशी प्रोजेक्ट बुक करा व मिळवा पैठणी
प्रकाश घुगे : ९४२३७८५९६५ ऑफिस : ९८५०७१६४०६
श्रीरामपूर :- न. पा. हॉस्पिटल शेजारी, श्रीरामपूर
२००५ पासुन ग्राहकसेवेत

## महत्त्वाचे..

### भारतीय कबड्डी संघात नगरचे तीन खेळाडू

नगर तालुका: कॉमनवेल्थ कबड्डी चॅम्पियनशिप स्पर्धे साठी अहिल्यानगरच्या तीन कबड्डीपटूंची भारतीय वरिष्ठ पुरुष संघात निवड झाली आहे. या स्पर्धा २१ ते ३१ दरम्यान अहमदाबाद येथे होणार आहेत. अमॅच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाने (एकेएफआय) नुकतीच पुरुष व महिला गटाची १४ कबड्डीपटूंची यादी जाहीर केली आहे. या संघात नगर जिल्ह्यातील अजित पवार, आदित्य शिंदे व शिवम पटारे आदींचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे जिल्ह्याच्या कबड्डी क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील तीन खेळाडूंची राष्ट्रकुल स्पर्धेसाठी भारतीय कबड्डी संघात निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष खासदार नीलेश लंके, सचिव शशिकांत गाडे, उपाध्यक्ष संजय फडके, सहसचिव विजयसिंह मिस्किन, खजीनदार प्रकाश बोरूडे, कैलास पटारे, प्रशांत पवळ, प्रशिक्षक शंतनू पांडव, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, बाळासाहेब कडूस, सुधाकर सुंबे, विनायक भुतकर, पोपट कडूस, बळीराम सातपुते व पदाधिकारी, सदस्य आदींनी अभिनंदन केले.

# दुर्गोत्सव साजरा करताना आजही 'सुकन्या' बळी ठरतेय..!

## विजयादशमीच्या उंबरठ्यावर दोन आत्महत्या; महिला स्वातंत्र्याचा प्रश्न ऐरणीवर!

- पढेगावात विवाहितेची मृत्यूशी झुंज संपली
- खंडाळ्यात प्रेमप्रकरणातून अल्पवयीन मुलीची जीवनयात्रा संपली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :** नवरात्रोत्सवाच्या सांगतेला आणि विजयादशमीच्या उंबरठ्यावर श्रीरामपूर तालुक्यातील पढेगाव आणि खंडाळा येथे घडलेल्या दोन आत्महत्यांच्या घटनांनी समाजमन सुन्न झाले आहे. पढेगाव येथे २३ वर्षीय विवाहितेने राहत्या घरात गळफास घेऊन जीवन संपवले, तर खंडाळा येथे प्रेमप्रकरणातून एका अल्पवयीन मुलीने गळफास घेतल्याची घटना समोर आली. खंडाळ्यातील अडचणीच्या आणि बंद अवस्थेतील इरिगेशन कॉलनीत गळफास घेतलेल्या अवस्थेत तरुणी दिसल्यानंतर गावकरी हादरून गेले. सण-उत्सवांच्या काळात घडलेल्या या दोन घटनांनी महिलांचे स्वातंत्र्य, त्यांची सुरक्षितता, कौटुंबिक वातावरण आणि तरुणींच्या भावविश्वाकडे समाज किती गांभीर्याने पाहतो, असे अस्वस्थ करणारे प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणले आहेत.

पढेगाव येथील सुकन्या विशाल घोडे या विवाहितेच्या आत्महत्येनंतर अंत्यसंस्काराच्या वेळी माहेर आणि सासरच्या नातेवाईकांमध्ये वाद निर्माण झाला. या वादाला मारहाणीचे स्वरूप आले. परिस्थिती चिघळण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर रात्री दहाच्या सुमारास अंत्यविधी शांततेत पार पडला. या घटनेमुळे गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

सुकन्या यांच्या लहान मुलाची प्रकृती बिघडल्याने त्याला उपचारासाठी श्रीरामपूर येथे नेण्याची तयारी सुरू होती. त्यांचे पती विशाल घोडे वाहन काढण्यासाठी गेले असता वाहनाचे चाक पंचर असल्याचे त्यांच्या लक्षात आले. ते दुरुस्तीसाठी गेले असताना सुकन्या यांनी घरात गळफास घेतल्याचे समोर आले. त्यांच्या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

दुसरीकडे, खंडाळा येथे प्रेमप्रकरणातून अल्पवयीन मुलीने आत्महत्या केल्याची घटना समोर आली. बंद अवस्थेतील इरिगेशन कॉलनीत तरुणीचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. या घटनेमागील नेमकी परिस्थिती आणि कारणांचा तपास होणे आवश्यक आहे.

**■ एकाच तालुक्यात, एकाच सणासुदीच्या काळात घडलेल्या या दोन घटनांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. महिलांच्या आयुष्याविषयी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, कौटुंबिक ताणतणाव, प्रेमसंबंधांमधील गुंतागुंत आणि संकटाच्या क्षणी आधार देणारी व्यवस्था यांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज या घटनांनी अधोरेखित केली आहे. सणांचा उत्साह आणि विजयादशमीचा आनंद साजरा होत असताना दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला. महिलांच्या स्वातंत्र्याची चर्चा केवळ व्यासपीठांपुरती मर्यादित न राहता त्यांच्या प्रत्यक्ष जगण्यात सुरक्षितता, सन्मान आणि निर्णयस्वातंत्र्याची हमी कधी मिळणार, हा प्रश्न या घटनांमुळे पुन्हा उपस्थित झाला आहे.**

# 'दहा हजार मते बाद होतात, तर पदवी कोणी दिली?'

## शिक्षक-पदवीधरांच्या मतांवर फडणवीसांची मिश्किल टोलेबाजी; महायुती सरकारच्या कामगिरीचे समर्थन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सांगली :** शिक्षकांचे सर्वाधिक प्रश्न सोडवण्याचे काम महायुती सरकारने केले असून, महाराष्ट्राला उद्योग आणि परकीय गुंतवणुकीत देशात आघाडीवर ठेवण्यात सरकार यशस्वी ठरले आहे. राज्यात दुष्काळी परिस्थिती असतानाही सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणूक प्रचारासाठी सांगलीत आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी मतांची बाद होणारी संख्या आणि मतदारांच्या शैक्षणिक पात्रतेचा संदर्भ देत त्यांनी मिश्किल टिप्पणी केली.

'दहा हजार मते बाद होत असतील, तर अशा पदवीधर आणि शिक्षकांना पदवी कोणी दिली, हे तपासावे लागेल,' असा टोला फडणवीस यांनी लगावला. त्यांच्या या विधानाची उपस्थितांमध्ये चर्चा रंगली. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी आयोजित मेळाव्यात त्यांनी सरकारच्या काम गिरीचा लेखाजोखा मांडत विरोधकांवरही निशाणा साधला. (पान ४ वर)

## ११२ शेतकरी कर्जमाफीपासून वंचित

# सव्वादोन कोटींचा प्रश्न ऐरणीवर!

### टाकळीभान सेवा संस्थेतील प्रकरणाची चौकशी होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** तीन कर्जमाफी प्रक्रियांनंतरही ११२ शेतकरी लाभापासून वंचित राहिल्याने टाकळीभानमधील कर्जमाफीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाल्यास सेवा संस्थेला सुमारे सव्वादोन कोटी रुपयांची रक्कम मिळण्याची शक्यता आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत श्रीरामपूरच्या सहकार विभागाने वंचित शेतकऱ्यांची बैठक घेऊन संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी, कर्जखात्यांचे लेखापरीक्षण आणि संस्थेच्या अभिलेखांची तपासणी करण्याचे आश्वासन दिले आहे. (पान ४ वर)



# सैन्यात भरतीचे आमिष दाखवून ३४ लाखांची फसवणूक

## पारनेर पोलिसांकडून आरोपीला अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पारनेर :** सैन्यात भरती करून देण्याचे आमिष दाखवून बनावट नियुक्तिपत्रे आणि मेसेजच्या माध्यमातून फसवणूक करणाऱ्या आरोपीला पारनेर पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात फिर्यादी व साक्षीदारांची तब्बल ३४ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक झाली आहे.

याप्रकरणी वडुले (ता. पारनेर) येथील ३६ वर्षीय महिलेने पारनेर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून १२ ऑक्टोबर २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की , फिर्यादीचा मुलगा दिपराज रमेश सोनवणे (वय १७) याच्यासह इतर साक्षीदारांना आरोपीने सैन्यात भरती करून देण्याचे आमिष दाखवून बेळगाव (कर्नाटक) येथील ११५ इन्फंट्री बटालियन (टीए) महार सेंटरमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांशी ओळख असल्याची खोटी माहिती दिली. तसेच भरती न झाल्यास पैसे परत देण्याचे आश्वासन दिले.

आरोपीने साक्षीदारांच्या मोबाईलवर बनावट ई-मेल आयडी तयार करून त्याद्वारे सैन्यात भरती झाल्याबाबतचे खोटे संदेश पाठवले. तसेच प्रशिक्षणासाठी हजर राहण्यासंदर्भात बनावट मजकूर आणि टँकरसह बनावट जॉइनिंग लेटर तयार करून साक्षीदारांची दिशाभूल केली. या प्रकरणांमध्ये एकूण ३४ लाख रुपये घेतल्याचे तपासात समोर आले आहे. ही रक्कम आयडीबीआय बँकेतील खात्यावर घेऊन आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे.

या प्रकरणातील आरोपीचा सातारा जिल्ह्यात शोध घेऊन १३ ऑक्टोबर २०२६ रोजी अटक करण्यात आली. अटक केलेल्या आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता त्याला पोलीस कोठडी देण्यात आली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे, पोलीस कर्मचारी जी. एस. डहाळे, डी. जी. अकोलकर, डी. एम. केतके तसेच दक्षिण मोबाइल सेलचे राहुल गुंड व अरुण सांगळे यांनी सहभाग घेतला.या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे करीत आहेत.

**सैन्यात किंवा इतर शासकीय सेवेत भरती करून देण्याचे आमिष दाखवून पैशांची मागणी करणाऱ्या व्यक्तींपासून नागरिकांनी सावध राहावे. कोणत्याही नियुक्तिपत्राची किंवा भरतीसंदर्भातील संदेशाची अधिकृत यंत्रणेकडून खातरजमा केल्याशिवाय आर्थिक व्यवहार करू नयेत.**

# शनैश्वराच्या दानपेटीत ३५ लाखांहून अधिक रोख रक्कम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिंगणापूर :** श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर येथील श्री शनैश्वर देवस्थानच्या १८ दानपेट्यांमधून ३५ लाख ४२ हजार १५२ रुपये रोख रक्कम प्राप्त झाली आहे. शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी सीसीटीव्हीच्या निगराणीखाली दानपेट्यांतील रकमेची मोजणी करण्यात आली. यामध्ये रोख रकमेसह ३१ हजार ९६० रुपये किमतीचे सोने आणि १२ हजार १५५ रुपये किमतीची चांदी प्राप्त झाली. मोजणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जमा झालेली रोख रक्कम महाराष्ट्र बँकेत जमा करण्यात आली.

**जमा रक्कम बँकेत जमा–** दानपेट्यांमधून प्राप्त झालेल्या रोख रकमेची अधिकृत नोंद ठेवण्याची प्रक्रिया देवस्थानच्या लेखा विभागाकडून करण्यात आली. मोजणी पूर्ण झाल्यानंतर ३५ लाख ४२ हजार १५२ रुपयांची रोख रक्कम तातडीने महाराष्ट्र बँकेत जमा करण्यात आली. दानपेट्यांमधून प्राप्त होणाऱ्या देणग्यांची नोंद आणि त्यांची सुरक्षितता याबाबत देवस्थान प्रशासनाकडून आवश्यक खबरदारी घेण्यात आली.

श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर येथे शनिदर्शनासाठी देशभरातून हजारो भाविक येत असतात. शनैश्वराच्या चरणी श्रद्धेने दान (पान ४ वर)

### 'न्याय न मिळाल्यास उच्च न्यायालयात जाणार'

**अनिल कोकणे, कर्जमाफीपासून वंचित शेतकरी : कर्जमाफी न मिळाल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. नव्याने कर्ज मिळण्यात अडचणी येत आहेत. या प्रकरणाची योग्य चौकशी करून वंचित शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही, तर उच्च न्यायालयात जाण्याची तयारी आहे.**

दै.राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...



- शुभेच्छुक -
मा.भैय्या पठाण, जेष्ठ कबड्डी खेळाडू
टाकळीभान



मा.श्री.अस्लम इनामदार
ऑलंपिक कबड्डी स्पर्धेत सुवर्ण पदक विजेता



मा.श्री.शिवम पटारे
आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू व प्रो कबड्डी गोल्ड मेडलिस्ट

वधवा क ले क्श न्स
- स्नेहांकित -
जुगलकिशोर शालिग्राम वधवा
सचिन जुगलकिशोर वधवा
योगेश जुगलकिशोर वधवा
आणि समस्त वधवा परिवार
आपले आगमन हाच आमचा आनंद!
• ३०,००० स्केअर फुटांच्या भव्य दालनात फॅशनचा नवा आविष्कार!
• नवनवीन डिझाईन, आकर्षक स्टाईल, लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी फॅशनेबल कपड्यांचे भव्य दालन!
• वधवा कलेक्शनला अवश्य भेट द्या, फॅशनच्या दुनियेचा आनंद लुटा!
भव्य स्थलांतर सोहळा
आपल्या प्रेम व विश्वासाने साकारलेल्या वधवा कलेक्शनच्या नव्या भव्य दालनाच्या शुभारंभास आपली उपस्थिती व शुभाशीर्वाद लाभावेत, ही नम्र विनंती!
शुभदिन : विजयादशमी
मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६
वेळ : सकाळी १० वाजल्यापासून
स्थळ : संत गाडगेबाबा चौक, पायरडी रोड, शेवगाव.

मा.श्री.समशेरखाँ (भैय्या) पठाण
माजी संचालक
कार्यकार्य सेवा सह. सोसायटी
टाकळीभान, ता.श्रीरामपूर,
जिल्हा अहिल्यानगर

मा.श्री.शिवम पटारे
आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू व प्रो कबड्डी गोल्ड मेडलिस्ट
- शुभेच्छुक -
शिवम पटारे मित्र मंडळ
टाकळीभान



दै.राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...
गोपालकृष्ण ट्रेडर्स
कांदा व आडते व्यापारी
प्रोप्रा.सुभाष ब्राम्हणे.मो.९४२२२९०७१४

नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!
।। विना सहकार नाही उद्धार ।।
टाकळीभान विविध कार्य. सह.विकास सेवा संस्था मर्या;
टाकळीभान, ता.श्रीरामपूर
चेअरमन–श्री.राहुल आप्पासाहेब पटारे
व्हा.चेअरमन–श्री.रोहिदास वामनराव बोडखे
- सन्मा.संचालक -
श्री.मंजाबापू धोंडिबा थोरात
श्री.अविनाश जगन्नाथ लोखंडे
श्री.विजय दिनकर कोकणे
सौ.पुष्पलता भाऊसाहेब मगर
सौ.सुनंदा भास्कर कोकणे
श्री.निलेश आप्पासाहेब कापसे
श्री.एकनाथ विठ्ठलराव पटारे
श्री.नितीन विठ्ठलराव पटारे
श्री.शिवाजी रामकृष्ण पवार
सौ.शांताबाई दत्तात्रय नाईक
श्री.देवदान लक्ष्मण रणनवरे
सौ.संगिता प्रकाश गायकवाड
सचिव–रामनाथ सिताराम ब्राम्हणे व कर्मचारी वृंद, टाकळीभान

# गुन्हा दाखल झाल्यानंतरही ७१ महिलांना आरोपींकडून त्रास

- श्रीरामपूर पोलीस विभागाचा विशेष उपक्रम
- सुमारे एक हजार पीडित महिलांशी थेट संपर्क

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अन्याय सहन करू नका, पोलिसांत तक्रार करा!**
महिला, युवती आणि शाळकरी मुला-मुलींना छेडछाड, धमकी, पाठलाग किंवा विनयभंगाचा त्रास होत असल्यास त्यांनी न घाबरता जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करावी. तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन गोपनीयता आणि सुरक्षिततेला प्राधान्य दिले जाईल. संबंधित दोषींवर कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असे आवाहन अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी केले आहे.



**माळवाडगाव :** महिला आणि मुलींच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत, गुन्हा दाखल झाल्यानंतर पीडित महिलांना आरोपींकडून पुन्हा त्रास दिला जात आहे का, याची खातरजमा करण्यासाठी श्रीरामपूर पोलीस विभागाने विशेष मोहीम राबविली. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विभागातील १७ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत मागील दोन वर्षांतील बलात्कार आणि विनयभंगाच्या गुन्ह्यांतील तक्रारदार महिलांशी संपर्क साधून त्यांच्या सुरक्षिततेची विचारपूस करण्यात आली. या मोहिमेत सुमारे एक हजार महिला व मुलींशी संवाद साधण्यात आला. त्यापैकी ७१ महिलांनी आरोपींकडून पुन्हा त्रास होत असल्याचे सांगितले.

श्रीरामपूर पोलीस विभागाच्या कार्यक्षेत्रात मागील दोन वर्षांत बलात्काराचे २५३ आणि विनयभंगाचे ६६६ असे एकूण ९१९ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. या प्रकरणांतील पीडित महिलांची सध्याची परिस्थिती जाणून घेणे, आरोपींकडून धमकावणे किंवा अन्य प्रकारचा त्रास दिला जात आहे का, तसेच पोलिसांच्या कारवाईबाबत त्यांचे समाधान आहे का, याची माहिती घेण्यासाठी ही मोहीम राबविण्यात आली. जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन आणि अप्पर पोलीस अधीक्षक सोम नाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे यांच्या समन्वयातून महिला पोलिसांचे विशेष पथक तयार करण्यात आले. या पथकाने संबंधित महिलांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यापैकी ८४६ महिलांनी पोलिसांच्या कारवाईबाबत सकारात्म क प्रतिक्रिया दिली, तर ७१ महिलांनी पुन्हा त्रास होत असल्याचे सांगितले. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि आवश्यकतेनुसार (पान ४ वर)

# सहकार 'गोकुळ'साठी सत्तेचे महाभारत..!

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

कोल्हापूरच्या राजकारणात गोकुळ दूध संघ ही केवळ सहकारी संस्था नाही, तर जिल्ह्याच्या राजकीय सत्तासमीकरणांचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळेच गोकुळच्या निवडणुकीत झालेली अटीतटीची लढत, बारा तास चाललेली मतमोजणी, फेरमतमोजणीवरून निर्माण झालेला पेच आणि अखेर अवघ्या एका जागेच्या फरकाने लागलेला निकाल यांना विशेष महत्त्व आहे. आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने २५ पैकी १३ जागा जिंकत सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा केला, तर महायुतीला १२ जागांवर समाधान मानावे लागले. हा निकाल म्हणजे सतेज पाटील यांच्यासाठी राजकीय प्रतिष्ठेची लढाई जिंकण्याबरोबरच सहकार क्षेत्रातील आपले नेतृत्व सिद्ध करण्याची संधी आहे.

गोकुळच्या निवडणुकीत दोन्ही बाजूंनी प्रतिष्ठा पणाला लावली होती. महायुतीकडे राज्यातील सत्तेचे पाठबळ आणि अनेक दिग्गज नेत्यांची ताकद होती; दुसरीकडे सतेज पाटील यांनी स्थानिक पातळीवरील संघटनशक्ती आणि समविचारी नेत्यांची मोट बांधून आव्हान उभे केले. अखेरचा कौल त्यांच्या बाजूने गेला. या निकालातून एक गोष्ट स्पष्ट होतेराज्याची सत्ता हाताशी असली, तरी स्थानिक सहकार संस्थांमध्ये विजयाची हमी मिळत नाही. मतदारांशी असलेला संपर्क, स्थानिक प्रश्नांची जाण आणि विश्वासाचे राजकारण यांनाही तितकेच महत्त्व असते.

मात्र, या विजयाचा खरा थरार मतमोजणीदरम्यान दिसला. सुरुवातीच्या आकडेवारीत आघाडीचे चित्र बदलत राहिले. फेरमतमोजणीत अमर पाटील यांचा विजय झाल्याने संपूर्ण समीकरणच बदलले. त्यानंतर महायुतीच्या अन्य उमेदवारांनी फेरमतमोजणीसाठी अर्ज केले. दोन्ही बाजूंच्या प्रतिनिधींनी आक्षेप आणि युक्तिवाद केल्यानंतर काही अर्ज फेटाळण्यात आले. अखेर १३ विरुद्ध १२ असा निकाल स्पष्ट झाला. एका जागेने सत्तेचा फैसला करणारी ही निवडणूक सहकार क्षेत्रातील मतमोजणी प्रक्रियेची पारदर्शकता आणि विश्वासार्हता किती महत्त्वाची आहे, याची जाणीव करून देते.

फेरमतमोजणी मागणे हा उमेदवारांचा कायदेशीर प्रक्रियेतील अधिकार आहे. मात्र, या प्रक्रियेमुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये, याची जबाबदारी निवडणूक यंत्रणेवर आहे. प्रत्येक टप्प्याची स्पष्ट माहिती, आक्षेपांवरील कारणांसहित निर्णय आणि अंतिम निकालाची अधिकृत घोषणा यांमुळेच लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास दृढ होतो. विजयाच्या आनंदात किंवा पराभवाच्या नाराजीत या मूलभूत तत्त्वांकडे दुर्लक्ष होता कामा नये.

गोकुळचे महत्त्व केवळ राजकीय वर्चस्वापुरते मर्यादित नाही. या संस्थेशी हजारो दूध उत्पादक शेतकरी, ग्रामीण अर्थव्यवस्था, दूध संकलन, प्रक्रिया, वाहतूक आणि बाजारपेठ यांचे हितसंबंध जोडलेले आहेत. त्यामुळे सत्ताधारी संचालक मंडळासमोर सर्वांत मोठे आव्हान असेल ते शेतकऱ्यांचा विश्वास सार्थ ठरवण्याचे. दूध उत्पादकांना योग्य दर, वेळेवर देयके, गुणवत्तेवर आधारित पारदर्शक व्यवस्था, संस्थेचे आर्थिक शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि दूध व्यवसायातील आधुनिकतेला प्रोत्साहन या मुद्द्यांवर नव्या नेतृत्वाची परीक्षा होणार आहे.

अवघ्या एका जागेच्या बहुमतामुळे विजय मिळवणाऱ्या आघाडीने विरोधकांना कमी लेखण्याची चूक करू नये. १२ जागांवर मिळालेला महायुतीचा कौल हा देखील महत्त्वाचा आहे. विरोधकांनी विधायक भूमिका बजावावी आणि सत्ताधाऱ्यांनी त्यांच्याकडे राजकीय शत्रू म्हणून न पाहता संस्थेच्या हितासाठी आवश्यक असलेला लोकशाहीतील प्रतिस्पर्धी म्हणून पाहावे.

गोकुळच्या निकालाने सतेज पाटील यांचे राजकीय वजन निश्चितच वाढले आहे; परंतु या विजयाचे खरे मोजमाप आगामी राजकीय समीकरणांत नव्हे, तर दूध उत्पादकांच्या जीवनात झालेल्या सकारात्मक बदलांत होईल. सहकार हा राजकीय सत्तेचा जिना नसून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचे साधन आहे, हे नव्या नेतृत्वाने सिद्ध करावे. गोकुळवर कोणाची सत्ता आली, यापेक्षा गोकुळमुळे दूध उत्पादक किती सक्षम झाले, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

सत्तेचा कौल मिळाला आहे; आता विश्वासाचा कौल मिळवण्याची वेळ आहे. गोकुळच्या नव्या कारभाराने राजकारणापेक्षा सहकाराला आणि सत्तासंघर्षापेक्षा शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले, तरच हा विजय खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल.

## अशोकच्या ७० व्या गळीत हंगामाचा २१ ऑक्टोबरला शुभारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** अशोक सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६-२७ च्या ७० व्या बॉयलर अग्नी प्रदीपन व ऊस गळीत हंगाम शुभारंभाचा कार्यक्रम बुधवार दि.२१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ४ वा. सराला बेटाचे मठाधिपती महंत रामगिरीजी महाराज यांचे शुभहस्ते आणि अशोक सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माजी आ.भानुदास मुरकुटे यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. या प्रसंगी कारखान्याचे संचालक यशवंत रणनवरे आणि त्यांची पत्नी सौ.अर्चनाताई रणनवरे तसेच कारखान्याचे डेप्यु. चिफ इंजिनिअर विकास शिवरकर आणि त्यांची पत्नी सौ.माधुरीताई शिवरकर या उभयतांच्या हस्ते विधीवत बॉयलर पूजन करण्यात येणार आहे. याबरोबरच कारखान्याचे संचालक बाबासाहेब आदिक आणि त्यांची पत्नी सौ.आशाताई आदिक तसेच कारखान्याचे उप शेतकी अधिकारी प्रदीप शिंदे आणि त्यांची पत्नी सौ.जयश्रीताई शिंदे या उभयतांच्या हस्ते विधिवत गव्हाण पूजन होणार आहे.

या शुभारंभ सोहळ्यास कारखान्याचे सर्व सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी वाहतूक कंत्राटदार व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन व्हा.चेअरमन आदिनाथ झुराळे, कार्यकारी संचालक संतोष देवकर व संचालक मंडळाच्या सर्व सदस्यांनी केले आहे.



येडेश्वरी प्रतिष्ठान आयोजित शारदीय नवरात्र उत्सव विद्यासागर कॉलनी सारसनगर अहिल्यानगर अध्यक्ष मयूर बाबासाहेब लोखंडे सर्व सहकारी यश शिंदे, आनंद राठोड, पृथ्वीराज लोखंडे, किरण शिंदे, किरण आजबे, कृष्ण भागानगरी, हर्षल सानप, सार्थक होनराव, प्रवीण शिंदे, गौरव शिंदे, किरण खेडकर व आदित्यरांदवणे विद्यासागर कॉलनी सर्व मित्र परिवार.

# गुन्हा दाखल झाल्यानंतरही ७१ महिलांना आरोपींकडून त्रास

## श्रीरामपूर पोलीस विभागाचा विशेष उपक्रम; सुमारे एक हजार पीडित महिलांशी थेट संपर्क

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव :** महिला आणि मुलींच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत, गुन्हा दाखल झाल्यानंतर पीडित महिलांना आरोपींकडून पुन्हा त्रास दिला जात आहे का, याची खातरजमा करण्यासाठी श्रीरामपूर पोलीस विभागाने विशेष मोहीम राबविली. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विभागातील १७ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत मागील दोन वर्षांतील बलात्कार आणि विनयभंगाच्या गुन्ह्यांतील तक्रारदार महिलांशी संपर्क साधून त्यांच्या सुरक्षिततेची विचारपूस करण्यात आली. या मोहिमेत सुमारे एक हजार महिला व मुलींशी संवाद साधण्यात



आला. त्यापैकी ७१ महिलांनी आरोपींकडून पुन्हा त्रास होत असल्याचे सांगितले. श्रीरामपूर पोलीस विभागाच्या कार्यक्षेत्रात मागील दोन वर्षांत बलात्काराचे २५३ आणि विनयभंगाचे ६६६ असे एकूण ९१९ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. या प्रकरणांतील पीडित महिलांची सध्याची परिस्थिती जाणून घेणे, आरोपींकडून धमकावणे किंवा अन्य प्रकारचा त्रास दिला जात आहे का, तसेच पोलिसांच्या कारवाईबाबत त्यांचे समाधान आहे का, याची माहिती घेण्यासाठी ही मोहीम राबविण्यात आली.जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन आणि अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे यांच्या समन्वयातून महिला पोलिसांचे विशेष पथक तयार करण्यात आले. या पथकाने संबंधित महिलांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यापैकी ८४६ महिलांनी पोलिसांच्या कारवाईबाबत सकारात्मक प्रतिक्रिया दिली, तर ७१ महिलांनी पुन्हा त्रास होत असल्याचे सांगितले. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. या मोहिमेत महिला पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे यांच्यासह बेबी शिंदे, सविता उंदरे, पूनम मंतोडे, रूपाली लोहाळे, शिवानी देशमुख, निशिगंधा कोळसे, वैष्णवी दहिटणेकर, तेजल अभंग आणि अर्चना अहिरे यांनी सहभाग घेतला.

### अन्याय सहन करू नका, पोलिसांत तक्रार करा!

महिला, युवती आणि शाळकरी मुला-मुलींना छेडछाड, धमकी, पाठलाग किंवा विनयभंगाचा त्रास होत असल्यास त्यांनी न घाबरता जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करावी. तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन गोपनीयता आणि सुरक्षिततेला प्राधान्य दिले जाईल. संबंधित दोषींवर कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असे आवाहन अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी केले आहे.

## दुष्काळ व पाणीटंचाईवर दीर्घकालीन धोरण राबविण्याची गरज



पावसाचे अनिश्चित स्वरूप, वाढते तापमान, भूजलपातळीत होणारी घट, पाण्याचा अमर्याद उपसा आणि पाण्याच्या नियोजनाचा अभाव यांमुळे दुष्काळाचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. व भविष्यातही ही समस्या संबंध सजीव सृष्टीला भेडसावणार आहे. दुष्काळ पडला की टँकर, चारा छावण्या, तात्पुरत्या पाणीपुरवठा योजना आणि आर्थिक मदतीच्या घोषणा केल्या जातात. मात्र, दुष्काळाचे संकट कायमस्वरूपी कमी करण्यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजना पुरेशा नाहीत. त्यासाठी दीर्घकालीन, शास्त्रीय, लोकसहभागावर आधारित आणि प्रभावीपणे राबविल्या जाणाऱ्या ठोस धोरणांची आवश्यकता आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील अनेक भागांना कमी पर्जन्यमान, पावसातील खंड आणि पाण्याच्या असमान उपलब्धतेचा सामना करावा लागतो. पाऊस पडूनही त्यातील मोठ्या प्रमाणावरील पाणी वाहून जाते आणि उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण होते. त्यामुळे पडणाऱ्या प्रत्येक थेंबाचे योग्य नियोजन करून पाणी जमिनीत मुरविणे, भूजलपातळी वाढविणे आणि उपलब्ध जलसाठ्यांचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. दुष्काळ निवारणासाठी जलसंधारणाच्या कामांना केवळ योजनांपुरते मर्यादित न ठेवता त्यांची शास्त्रीय पद्धतीने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. गावागावांतील ओढे, नाले, तलाव, बंधारे आणि पारंपरिक जलस्रोत यांचे पुनरुज्जीवन करणे, पाणलोट क्षेत्र विकासाची कामे करणे, शेततळी उभारणे आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. मात्र, बंधारे बांधणे किंवा गाळ काढणे एवढ्यावरच जलसंधारणाची जबाबदारी संपत नाही. प्रत्येक कामाचे तांत्रिक मूल्यमापन, पाणीसाठ्यात झालेली वाढ, भूजल पुनर्भरण आणि प्रत्यक्ष लाभ यांची नियमित तपासणी झाली पाहिजे. निकृष्ट दर्जाची कामे आणि निधीचा अपव्यय रोखण्यासाठी पारदर्शक यंत्रणा उभारली पाहिजे. विहिरी आणि कूपनलिकांमधून होणारा अनियंत्रित पाणीउपसा हा अनेक भागांतील गंभीर प्रश्न आहे. पाण्याचा वापर उपलब्ध भूजलसाठ्याच्या क्षमतेनुसार झाला पाहिजे. भूजल पुनर्भरणासाठी गावनिहाय आराखडे तयार करून त्यांची अंमलबजावणी करावी. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत शेती आणि उद्योगांसाठी पाण्याचा संतुलित वापर करण्याचे धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.गावातील जलस्रोत, पाणी उपलब्धता, भूजलपातळी आणि भविष्यातील गरजा यांचा समावेश असलेला जल लेखा तयार केला पाहिजे. किती पाणी उपलब्ध आहे आणि त्याचा वापर कोणत्या कारणासाठी होणार आहे, याचे नियोजन ग्रामसभेच्या माध्यमातून केले तर पाणीवाटपात पारदर्शकता निर्माण होऊ शकते. गावातील पाणीवापराचे नियोजन ग्रामसभेत व्हावे. जलसंधारणाच्या कामांची सामाजिक तपासणी व्हावी आणि कामांचा लाभ प्रत्यक्ष किती झाला, याचा अहवाल सार्वजनिक करण्यात यावा. पाणी वाचविणाऱ्या गावांना प्रोत्साहन देण्याची व्यवस्थाही निर्माण करता येईल. दुष्काळ निवारणासाठी विविध योजना जाहीर होतात; परंतु अनेकदा निधी मंजुरी, प्रशासकीय प्रक्रिया, कामांची अपूर्णता आणि देखभालीचा अभाव यांमुळे अपेक्षित परिणाम साध्य होत नाहीत. जलसंधारणाच्या कामांचे नियमित लेखापरीक्षण आणि तांत्रिक परीक्षण व्हावे. काम पूर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल कोण करणार, याची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. केवळ खर्च झालेल्या निधीच्या आधारे यश मोजण्याऐवजी पाणीसाठ्यातील वाढ, भूजलपातळीतील सुधारणा, टँकरवरील अवलंबित्वात झालेली घट आणि शेतकऱ्यांना झालेला प्रत्यक्ष लाभ या निकषांवर योजनांचे मूल्यमापन करावे. दुष्काळ निवारणासाठी पाणीपुरवठा, शेती, रोजगार, पर्यावरण आणि ग्रामीण विकास यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. पाणलोट क्षेत्रातील वृक्षसंवर्धन, जमिनीची धूप रोखणे, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण यांना प्राधान्य दिले पाहिजे. तसेच हवामानातील बदलांचा विचार करून भविष्यातील पर्जन्यमान आणि पाण्याच्या मागणीचा अभ्यास करणारी यंत्रणा विकसित करणे गरजेचे आहे. दुष्काळ हा केवळ पावसाच्या कमतरतेचा प्रश्न नाही; तो पाण्याच्या नियोजनाचा, व्यवस्थापनाचा आणि सामूहिक जबाबदारीचा प्रश्न आहे. संकट निर्माण झाल्यानंतर मदत देणे आवश्यक असले, तरी संकट वारंवार निर्माण होऊ नये यासाठी आधीच नियोजन करणे अधिक महत्त्वाचे आहे. शासनाने ठोस धोरणे आखावीत, प्रशासनाने त्यांची वेळेत अंमलबजावणी करावी आणि नागरिकांनी पाणी बचतीची जबाबदारी स्वीकारावी. घोषणा आणि तात्पुरत्या उपाययोजनांच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष परिणाम देणारी कामे झाली, तरच दुष्काळमुक्त आणि जलसुरक्षित महाराष्ट्राचे स्वप्न साकार होऊ शकेल.



शब्दांकन
पत्रकार अर्जुन राऊत (टाकळीभान)
मो.८३७९८१००१८

# राहाता तालुक्यात पुन्हा असा प्रकार घडणार नाही, कठोर भूमिका घेऊ : विवेक गुंड

## आडगावच्या ग्रामस्थांना बीडीओंचे अश्वासन

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** राहाता तालुक्यातील आडगाव येथील पोल्ट्री फार्ममुळे गावात माशांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला असून यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या प्रश्नावर काल पीडित आडगाव ग्रामस्थांनी राहाता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विवेक गुंड यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी गटविकास अधिकारी विवेक गुंड हे ग्रामस्थांना म्हणाले की,आम्हाला कोणतेही राजकारण करायचे नाही, कोणालाही विनाकारण त्रास द्यायचा नाही आणि आम्हाला कोर्टाची पायरी चढायचीही नाही. आम्हाला फक्त गावातील रोगराई कायमची नष्ट करायची आहे. आम्हाला असे काम करायचे आहे की राहाता तालुक्यात पुन्हा असा प्रकार घडणार नाही आणि आमचे वरिष्ठ व डॉ. सुजय विखे पाटील सुद्धा आमच्या कामाचे कौतुक करतील. आरोग्य विभाग,



पशुसंवर्धन विभाग आणि ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने सध्या चौकशी सुरू आहे. या प्रक्रियेला थोडा वेळ लागेल, परंतु या प्रकरणी १०० टक्के कारवाई केली जाईल.

यावेळी ग्रामस्थांनी ९० टक्के जनता पोल्ट्री फार्म च्या बाजूने असल्याचा दावा खोडून काढला असून गावातील प्रवरा माध्यमिक विद्यालयाने ग्रामपंचायतीला निवेदन देऊन शाळेत माशांचा प्रचंड त्रास होत असल्याचे पत्र काही दिवसापूर्वी दिले आहे. शाळा रोज झाडून स्वच्छ केली जात असतानाही माशा काही केल्या कमी होत नसल्याचे शाळेने म्हटले आहे. हा प्रश्न केवळ अस्वच्छतेचा नसून तो थेट मुलांच्या आरोग्याशी निगडीत आहे. आडगावमध्ये हे एकमेव माध्यमिक विद्यालय असून गावातील सर्वच कुटुंबातील मुले-मुली तिथेच शिक्षण घेतात. अशा परिस्थितीत जर माशांचा प्रादुर्भाव असाच राहिला तर मुले आजारी पडण्याची भीती व्यक्त होत आहे. पुढील शैक्षणिक वर्षात मुलांना याच शाळेत घालायचे की नाही, असा गंभीर प्रश्न आता पालकांसमोर उभा राहिला आहे. यावेळी ग्रामस्थांनी आपली भूमिका स्पष्ट केली की, ज्या कारणामुळे माशा वाढल्या आहेत, त्यावर कायमस्वरूपी उपाय व्हावा आम्ही नियमाने आणि स्टेप बाय स्टेप या प्रश्नाचा पाठपुरावा करणार आहोत. प्रशासनाने आम्हाला आश्वासन दिले आहे, त्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे. मात्र जर वेळेत ठोस उपाय झाला नाही, तर मुलांच्या आरोग्यासाठी आम्हाला वेगळा विचार करावा लागेल. सत्य आमच्या बाजूने असल्याने आमचा विजय १०० टक्के होणारच, असा निर्धार यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केला.

### तालुक्यातील पोल्ट्री फार्म रडारवर

आडगावच्या माशी प्रश्नानंतर राहाता तालुक्यातील सर्वच पोल्ट्री फार्म आता प्रशासनाच्या रडारवर आले आहेत.

आडगाव येथे पोल्ट्री फार्ममुळे गावात माश्यांचा प्रचंड प्रादुर्भाव झाल्याने या प्रकाराला तोंड फुटले. या पार्श्वभूमीवर राहाता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विवेक गुंड यांनी ठाम भूमिका घेतली आहे. ''कोणाच्याही दबावाला बळी न पडता, नियमानुसार योग्य तोच निर्णय घेतला जाईल,'' असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

गुंड यांच्या या भूमिकेमुळे तालुक्यातील नियमबाह्य आणि प्रदूषणकारी सर्वच पोल्ट्री फार्मची चौकशी होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. त्यामुळे अवैधरित्या सुरू असलेल्या पोल्ट्री व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## श्री चैतन्य टेक्नो स्कूलमध्ये 'सांझी रास महोत्सव' उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील श्री चैतन्य टेक्नो स्कूलमध्ये नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित 'सांझी रास महोत्सव' गरबा महोत्सव उत्साहात पार पडला. १५ आणि १६ ऑक्टोबर रोजी आयोजित या महोत्सवात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या व परीक्षक म्हणून डॉ. वर्षा शिरसाठ उपस्थित होत्या. प्राचार्या सोनल शुक्ला यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. गरबा नृत्याचे उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या स्पर्धकांचे त्यांनी कौतुक केले. यावेळी विविध स्पर्धांतील विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. महोत्सवांतर्गत



१५ ऑक्टोबर रोजी पालकांसाठी कलश सजावट, पौराणिक प्रश्नमंजुषा, फुलांची रांगोळी आणि विनाशेगडी स्वयंपाक अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. १६ ऑक्टोबर रोजी झालेल्या गरबा महोत्सवात सहभागी स्पर्धकांनी आकर्षक नृत्याविष्कार सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. दोन्ही दिवसांच्या स्पर्धांतील विजेत्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी शाळेचे अधिष्ठाता सागर पाटील, प्राथमिक विभागाच्या प्रमुख मंजूशा गुंड, पूर्वप्राथमिक विभागाच्या प्रमुख आश्लेषा गोरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. पालक आणि विद्यार्थ्यांच्या सहभागाबद्दल शाळेच्या वतीने आभार मानण्यात आले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. शाळेच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## आदर्श विद्या मंदिरात पालक मेळावा

### विद्यार्थ्यांना ५०० पुस्तकांचा संच भेट; मंथन परीक्षेतील गुणवंतांचा गौरव

**शिंगणापूर :** सोनई येथील आदर्श विद्या मंदिराच्या प्राथमिक विभागात रविवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी पालक मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, सुरक्षितता, अभ्यासाच्या सवयी आणि पालकांची जबाबदारी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मंथन परीक्षेत जिल्हा व राज्यस्तरावर यश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे, पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव आणि संस्थेचे सचिव रविराज तुकाराम पाटील गडाख उपस्थित होते. सचिव रविराज पाटील गडाख यांनी वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना ५०० पुस्तकांचा संच भेट दिला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यास मदत होणार आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांनी मुलांच्या सुरक्षिततेकडे पालकांनी लक्ष द्यावे, असे आवाहन केले. पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव यांनी मोबाईलचा वापर मर्यादित ठेवून मुलांशी संवाद साधण्याचे आणि त्यांच्या अभ्यासात सहभागी होण्याचे महत्त्व सांगितले.

## पुणतांबा येथे वीर वडार एकता फाउंडेशनच्या शाखेचे उद्घाटन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** वडार समाजातील विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी समाजबांधवांनी एकत्र येऊन संघटना मजबूत करावी आणि समाजाच्या विकासासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वीर वडार एकता फाउंडेशनचे संस्थापक विजयदादा गोरे यांनी केले.



पुणतांबा येथे वीर वडार एकता फाउंडेशनच्या शाखेची स्थापना करण्यात आली. या शाखेच्या उद्घाटनप्रसंगी गोरे यांनी व्हिडिओ संवादाद्वारे समाजबांधवांना मार्गदर्शन केले. फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील गोरगरीब बांधवांच्या प्रश्नांसाठी काम केले जात असून, समाजजागृतीसाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे त्यांनी सांगितले. लवकरच शिर्डी येथे समाजबांधवांसाठी वडार भवन उभारण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. या वेळी राहता तालुकाध्यक्षपदी पुणतांबा येथील दीपक कुऱ्हाडे, तर उपाध्यक्षपदी विकास कुऱ्हाडे यांची नियुक्ती करण्यात आली. शहराध्यक्षपदी रामचंद्र पवार यांच्यासह सोमनाथ जाधव, विलास गायकवाड, अरविंद धोत्रे आणि पोपट पवार यांचा कार्यकारिणीत समावेश करण्यात आला. फाउंडेशनचे महासचिव ब्रह्मा धोत्रे, सहसचिव नितीन शेलार, राज्य उपाध्यक्ष रामू देवकर, संपर्कप्रमुख संपतराव गायकवाड, कोअर कमिटी सदस्य संदीप कुसळकर आणि दक्षिण जिल्हाध्यक्ष मारुती विटेकर यांच्या उपस्थितीत शाखेच्या फलकाचे अनावरण करण्यात आले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# तीन दिवसांच्या अथक शोधमोहिमेला अखेर यश

## प्रवरा नदीत बुडालेल्या युवकाचा मृतदेह आढळला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : प्रवरा नदीच्या पात्रात चानेगाव येथील बंधाऱ्यावर बुडालेल्या सतीश अप्पासाहेब वाणी (वय ३५, रा. झरेकाठी, ता. संगमनेर) या युवकाचा तीन दिवसांच्या अथक शोधमोहिमेनंतर मृतदेह आढळून आला. नदीचा वेगवान प्रवाह, खोल खड्डे आणि पाण्याखालील कपारी अशा प्रतिकूल परिस्थितीत विविध बचाव पथके, अग्निशमन दल, पोलीस प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि स्थानिक नागरिकांनी संयुक्तपणे शोधकार्य राबविले. अखेर या मोहिमेला यश आल्याने शोधकार्याची सांगता झाली; मात्र या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

चणेगाव येथील प्रवरा नदीवरील बंधाऱ्यात युवक बुडाल्याची घटना घडल्यानंतर त्याचा शोध घेण्यासाठी विविध यंत्रणांनी धाव घेतली होती. नदीतील वेगवान पाण्याचा प्रवाह, खोल खड्डे आणि पाण्याखालील कपारी यांमुळे शोधमोहिमेत अनेक अडथळे निर्माण होत होते. अशा आव्हानात्मक परिस्थितीतही बचाव पथकांनी हार न मानता सलग तीन दिवस शोधकार्य सुरू ठेवले. प्रत्येक संभाव्य ठिकाणी शोध घेत अखेर युवकाचा मृतदेह शोधण्यात यश मिळाले.

या शोधमोहिमेत अहिल्यानगर येथील इ. आर. टी रेस्क्यू टीमने सहभाग घेतला. राहुरी नगरपरिषद अग्निशमन दलाचे पवन देवरे, सुरेश वाघ व करण साळवे, राहाता नगरपरिषद अग्निशमन दलाचे ऋषिकेश दादासाहेब सदाफळ व प्रशांत विजय डांगे, तसेच श्रीरामपूर नगरपालिका अग्निशमन दलाचे दिनेश बागडे, मुज्जू शेख व शरद साठे यांनी शोधकार्यात योगदान दिले. आपत्ती व्यवस्थापन विभागाचे आपदा मित्र अनिल जाधव, रामराजे गायकवाड व



सुनील जाधव यांनीही मोहिमेत महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. आश्वी पोलीस ठाण्याचे ए. पी. आय शिरसाठ, बर्डे साहेब, लोणी पोलीस प्रशासन आणि स्थानिक नागरिकांनी शोधमोहिमेसाठी सहकार्य केले.

तीन दिवस सुरू असलेल्या या मोहिमेत विविध विभागांनी समन्वय साधत प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न केला. बचाव पथकांची चिकाटी, अग्निशमन दलाचे प्रयत्न, पोलीस प्रशासनाची मदत आणि स्थानिक नागरिकांचे सहकार्य यांमुळे अखेर शोधकार्य पूर्ण झाले. या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून, सतीश वाणी यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. संकटाच्या काळात विविध यंत्रणांनी दाखविलेला समन्वय आणि सेवाभाव या मोहिमेच्या निमित्ताने अधोरेखित झाला.

## दखल

### गोदावरीवरील बंधारे तातडीने भरण्याची मागणी, जलसंपदामंत्र्यांना निवेदन

**माळवाडगाव** : छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या वतीने गोदावरी नदीवरील वांजरगाव, खानापूर आणि कमालपूर येथील बंधारे पिण्याच्या पाण्यासाठी तातडीने भरून द्यावेत, अशी मागणी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे करण्यात आली. श्रीरामपूर येथे झालेल्या टंचाई आढावा बैठकीत यासंदर्भातील निवेदन सादर करण्यात आले. गोदावरी नदीवरील हे बंधारे कोरडे पडल्याने ऑक्टोबर महिन्यातच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. वैजापूर आणि गंगापूर तालुक्यांतील अनेक गावांच्या पाणीपुरवठा विहिरी गोदावरी नदीपात्रात आहेत. त्यामुळे बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडले नाही, तर तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय नांदूर मधमेश्वर जलदगती कालव्याचे आवर्तन सोडावे आणि नियोजित शनिदेवगाव उच्च पातळी बंधाऱ्याचे काम सुरू करावे, अशी मागणीही करण्यात आली. गलांडे यांचे प्रतिनिधी सिताराम भराडे, भाजपचे वैजापूर उपतालुकाप्रमुख देविदास सामसे, पंचायत समिती सदस्य निखिल तांबे आणि प्रवीण चव्हाण यांनी ही निवेदने जलसंपदामंत्र्यांना सादर केली.

### नगरपालिकेच्या वतीने चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा



**श्रीरामपूर** : श्रीरामपूर नगर पालिकेच्या वतीने सेवा संकल्प अभियान अंतर्गत लोकमान्य टिळक वाचनालय येथील आगाशे सभागृह या ठिकाणी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा शुभारंभ श्रीरामपूर नगरपालिकेच्या उपनगराध्यक्ष कांचनताई सानप नगरसेवक संजय गांगड, वैशालीताई पोटे, नगरपालिकचे उपमुख्याधिकारी महेंद्र ताकपिरे, गटशिक्षणधिकारी दीपक त्रिभुवन यांच्या हस्ते करण्यात आला. या स्पर्धेसाठी इयत्ता ५ ते ८ वी गटाकरीता चित्रकला स्पर्धा तसेच इयत्ता ८ ते १० वी च्या गटाकरिता वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. चित्रकला स्पर्धेसाठी विकसित भारत संकल्पना तर वक्तृत्व स्पर्धेसाठी मुलांच्या स्वप्नातिल भारत २०४७ असे विषय ठेवण्यात आलेले होते. या स्पर्धेस शहरातील शाळेतील विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. चित्रकला स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रमोद हरदास, चंद्रकांत सांगळे व दीपक तरकसे यांनी तर वक्तृत्व स्पर्धेसाठी मदने योगिता व निर्मला लांडगे यांनी काम पाहिले. विजेत्या स्पर्धकाना प्रशस्तीपत्रक व चित्रकला संच देवून सन्मानित केले जाणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षण विभागाचे रुपेश गुजर,किशोर त्रिभुवन,संभाजी त्रिभुवन वाचनालय विभागाचे दीपक मारशिया, स्वप्नील माळवे, किशोर बर्डे तसेच लाईट विभगाचे चव्हाण व त्यांचे सर्व सहकारी यांनी परिश्रम घेतले.

## दुष्काळाच्या संकटात शुभकीर्ती उद्योग समूहाचा मदतीचा हात

### ११ गरीब जोडप्यांच्या विवाहाचा खर्च उचलणार




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर समाजातील गोरगरीब कुटुंबांना दिलासा देण्यासाठी राहुरी येथील शुभकीर्ती उद्योग समूहाने सामाजिक बांधिलकी जपत महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील ११ जोडप्यांच्या विवाहाचा खर्च समूहाच्या वतीने स्वीकारण्यात येणार असून, दिवाळीनंतर सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती शुभकीर्ती उद्योग समूहाचे अध्यक्ष सतीश तनपुरे यांनी दिली.

राहुरी फॅक्टरी येथील वैष्णवी चौक युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित नवरात्र उत्सवाला सतीश तनपुरे यांनी भेट दिली. यावेळी राहुरी ते वैष्णवी देवी अशी पायी पदयात्रा सतीश तनपुरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी बोलताना तनपुरे यांनी ११ गरीब जोडप्यांच्या विवाहाची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्णय जाहीर केला.

दुष्काळामुळे सर्वसामान्य कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत मुला-मुलींचे विवाह पार पाडताना कुटुंबांवर आर्थिक भार पडतो. ही बाब लक्षात घेऊन गरजू कुटुंबांना आधार देण्यासाठी शुभकीर्ती उद्योग समूहाने पुढाकार घेतला आहे. या उपक्रमामुळे ११ कुटुंबांना दिलासा मिळणार असून, सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण होणार आहे. यावेळी नगरसेवक प्रकाश संसारे, सौरभ मुसमाडे, चंदाराणी गाडे, जयश्री खांदे, वैभव गाडे, शिवचरित्रकार हसन सय्यद, नंदू मोरे, शरद खांदे, निवेदक संघटनेचे अध्यक्ष बापूसाहेब तनपुरे, धनंजय विटनोर, अमोल वाळुंज, विजय मोरे, सुनील जाधव आदी उपस्थित होते. आभार नगरसेवक वसंत कदम यांनी मानले.

## अनवाणी पावलांना मिळाला मायेचा आधार

### चौधरी यांच्याकडून शारदा विद्यालयातील ३०० विद्यार्थ्यांना चप्पलची भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी** : एखाद्याच्या अडचणी पाहून केवळ हळहळ व्यक्त करण्यापेक्षा त्या दूर करण्यासाठी प्रत्यक्ष पुढाकार घेणे हीच खरी माणुसकी असते. याच संवेदनशीलतेचा प्रत्यय देणारा उपक्रम नांदुरखी येथील प्रसिद्ध उद्योजक व साईभक्त भाऊसाहेब रामचंद्र चौधरी यांनी राहाता येथील रयत शिक्षण संस्थेच्या शारदा शैक्षणिक संकुलात राबवून एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. काही दिवसांपूर्वी राहाता शहरातून जात असताना शारदा विद्यालयासमोरून अनवाणी पायांनी शाळेत जाणाऱ्या काही गरजू विद्यार्थ्यांकडे भाऊसाहेब चौधरी यांचे लक्ष गेले. उन्हाची तीव्रता आणि रस्त्यावरील खड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांना होणारा त्रास पाहून त्यांचे मन हेलावले. त्यांनी तत्काळ सोबत माजी विद्यार्थी रवींद्र जोशी यांच्याशी चर्चा करून गरजू विद्यार्थ्यांची माहिती घेण्यास सांगितले. रमेश शिंदे यांच्याशी संपर्क साधून शाळेतील गरजू विद्यार्थ्यांची यादी तयार केली. त्या माहितीच्या आधारे भाऊसाहेब चौधरी यांनी सुमारे ३०० गरजू विद्यार्थ्यांना पॅरागॉन कंपनीच्या उत्तम दर्जाच्या चपला मोफत उपलब्ध करून दिल्या.

केवळ चप्पल वाटपावरच न थांबता, वर्गात बसून अभ्यास करताना विद्यार्थ्यांना होणारा उकाड्याचा त्रास लक्षात घेऊन चौधरी यांनी शाळेतील १७ वर्ग खोल्यांसाठी क्रॉम्प्टन कंपनीचे नवीन पंखे देखील भेट दिले. याशिवाय, क्रीडा स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून शालेय संघाला ५ हजार रुपयांचे रोख बक्षीस देण्यात आले. तसेच इन्स्पायर अवॉर्ड प्राप्त विद्यार्थी आकाश बोठे आणि त्याचे मार्गदर्शक शिक्षक साबळे सर यांचाही गौरव करण्यात आला. या संपूर्ण उपक्रमांतर्गत सुमारे ८० हजार रुपयांची आर्थिक मदत संस्थेला करण्यात आली आहे.

संकुलाचे मार्गदर्शक रमेश शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास सुमन वाबळे, प्राचार्या शीला संसारे, मुख्याध्यापक राजकुमार साळवे, विवेक गाडेकर, रमेश आहेर, प्रा. बाळासाहेब दिघे, प्रा. शरद गमे, बाळासाहेब दिघे, किशोर लोहारकर, पर्वत उरे, संजय खंदारे यांसह शिक्षक, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. योग्य वेळी गरजूंची गरज ओळखून मदत करणे हा दैवी गुण असल्याचे सांगत उपस्थित मान्यवरांनी चौधरी यांच्या दातृत्वाचे मनमोकळेपणाने कौतुक केले. या उपक्रमाबद्दल विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि राहाता परिसरातील नागरिकांमधून उद्योजक भाऊसाहेब चौधरी व रवींद्र जोशी यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा राष्ट्रीय स्तरावर सहा पुरस्कारांनी गौरव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**संगमनेर** : राज्याचे माजी शिक्षणमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, उद्योग क्षेत्राशी समन्वय आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाने राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवला आहे. जयपूर येथे आयोजित राष्ट्रीय उद्योग-शिक्षण परिषदेत महाविद्यालयाला सहा पुरस्कारांनी गौरविण्यात आले. यामुळे अमृतवाहिनीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. प्रसाद बाविस्कर यांनी दिली.

राजस्थानमधील जयपूर येथे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत झालेल्या 'नॅशनल लेव्हल इंडस्ट्री ॲकॅडमी कॉन्क्लेव्ह एज्युकेशन एक्सलन्स अवॉर्ड २०२६' या कार्यक्रमात महाविद्यालयाला हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अभियांत्रिकी संस्थेचा पुरस्कार, वाधवानी फाउंडेशनचा उत्कृष्ट संस्था पुरस्कार, मायक्रोचिप सेंटर ऑफ एक्सलन्स, पाच वर्षांच्या भागीदारीबद्दलचा पुरस्कार, दहा लाख आभासी प्रशिक्षण संधींच्या यशस्वी योगदानाबद्दलचा पुरस्कार आणि इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागाचा उत्कृष्ट विभाग पुरस्कार यांचा समावेश आहे.

उद्योगविश्वातील बदलत्या तंत्रज्ञानाची गरज ओळखून विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाऊड कम्प्युटिंग आणि सायबर सुरक्षा यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देत रोजगारक्षम बनविण्याच्या प्रयत्नांची दखल या पुरस्कारांच्या माध्यमातून घेण्यात आली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, संशोधन, शिस्त आणि अत्याधुनिक सुविधांच्या बळावर महाविद्यालयाने राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे.

माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयू ताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने ही कामगिरी केली. या यशाबद्दल बाळासाहेब थोरात, डॉ. सुधीर तांबे, शरयू ताई देशमुख, डॉ. जयश्रीताई थोरात, अनिल शिंदे आणि प्रा. व्ही. बी. धुमाळ यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले.

## कोपरगावातील अवैध मटका-जुगार अड्डे बंद करा; अन्यथा आंदोलन

### पोलिसांना सात दिवसांचा अल्टिमेटम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव** : शहरासह ग्रामीण भागात सुरू असलेले अवैध मटका व जुगार अड्डे तातडीने बंद करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहरप्रमुख गगन अ. हाडा यांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी कोपरगाव शहर व ग्रामीण पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

शहर आणि ग्रामीण परिसरात अवैध मटका व जुगाराचे धंदे वाढत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या अवैध धंद्यांमुळे तरुणांसह सर्वसामान्य नागरिक आणि गरीब कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवत असून, सामाजिक समस्या वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे पोलिसांनी केवळ तात्पुरती कारवाई न करता हे धंदे कायमस्वरूपी बंद करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली.

अवैध अड्ड्यांवर तातडीने छापे टाकावेत, पोलीस प्रशासनाने पारदर्शकपणे काम करून जनतेचा विश्वास संपादन करावा, तसेच अवैध धंदेचालकांना राजकीय किंवा प्रशासकीय अभय असल्यास त्याची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशा मागण्याही निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

येत्या सात दिवसांत अवैध धंदे बंद न झाल्यास अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सुदर्शन यांच्या स्तरावर पाठपुरावा करून आंदोलनाची तारीख जाहीर केली जाईल, असा इशारा हाडा यांनी दिला.

यावेळी तालुकाप्रमुख श्रीरंग चांदगुडे, उपजिल्हाप्रमुख संजय दंडवते, धर्मा जावळे, विजय गोर्डे, महेश कुलकर्णी यांच्यासह शिवसैनिक व युवासैनिक उपस्थित होते. निवेदनाच्या प्रती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. आशुतोष काळे आणि आ. विवेक कोल्हे यांनाही देण्यात आल्या.

## श्री जोगेश्वरी देवी मंदिरात संगीतमय कथेतून देवी महात्म्याचे निरूपण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील गोमळवाडी येथील प्राचीन व श्रद्धास्थान असलेल्या श्री जोगेश्वरी देवी (जगदंबा माता) मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित देवी भागवत कथेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. नवरात्रोत्सवाच्या मंगलमय पर्वात प्रकाशानंदगिरी महाराज यांनी गोमळवाडी येथे भेट दिली. त्यांच्या हस्ते श्री जोगेश्वरी देवीची विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर कीर्तनसेवेने देवी भागवत कथेचा शुभारंभ झाला. भागवताचार्य ह.भ.प. विनोद महाराज भालके आपल्या मधुर, सुरेल व संगीतमय वाणीतून देवीच्या महात्म्याचे भावपूर्ण निरूपण करीत आहेत. गोमळवाडी येथील नवरात्रोत्सवातील कीर्तन सोहळ्यात स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराज तसेच गोणेगाव चौफुला येथील रामकृष्ण आश्रमाचे प्रमुख महंत भगवान महाराज जंगले शास्त्री यांचीही कीर्तनसेवा झाली. या परिसरातील श्री जोगेश्वरी देवी हे महत्त्वाचे श्रद्धास्थान असल्याने देवी भागवत कथा ऐकण्यासाठी परिसरातील गावांमधून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. यामध्ये महिला भगिनींची संख्या लक्षणीय आहे. या धार्मिक सोहळ्याचे नियोजन सोहळा समितीचे सदस्य तथा सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब गाडेकर, माजी सरपंच बापूराव गाडेकर, निवृत्ती आरसुळे, गोरख माकोणे, माजी उपसरपंच सुखदेव टुबे, संजय कर्जुले, प्रकाश टुबे,बाबुराव गाडेकर,रमेश गर्जे,हरीनाना आरसुळे लक्ष्मण तमनर,लक्ष्मण बाचकर,एकनाथ बाचकर, राहुल तमनार यांनी केले आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिल गंगुबाई सुभाष झळके, रा. वळदगाव, ता.जि. छत्रपती संभाजीनगर यांनी दिलेल्या माहीतीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन जाहीर नोटीस देण्यात येते की, मौजे गोगलगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर येथील गट नंबर ४६/३/अ, क्षेत्र १ हे. ५६ आर व गट नंबर ४६/३/ब, एकुण क्षेत्र १ हे. ५६ आर पो.ख.०२ आर यापैकी स्वप्निल तुळशीराम मते यांचे हिस्याची ० हे. ४४ आर क्षेत्र विक्री करावयाची असुन अशी दोन्ही मिळुन २ हे. ०० आर क्षेत्राची चर्तुसिमा पुर्वेस-कॅनॉल, दक्षिणेस-गिडेगाव-गोगलगाव रस्ता, पश्चिमेस-गटापैकी, उत्तरेस-रामदास बाबासाहेब काळे यांचा गट नं.४६/३ अशी चर्तुसिमापुर्वक मिळकत असुन सदरची मिळकत ही अनुक्रमे हर्षदा हरिष मते व स्वप्निल तुळशीराम मते यांच्या नावावर व त्यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीत असुन आमचे अशिल व त्यांच्यामध्ये जमीनीच्या प्रचलित बाजारभावाप्रमाणे सौदा होवुन विक्री करण्याचे ठरलेले आहे.

सदर जमीन मालकांनी वरील जमीन निर्वेध व निंजोखमी व निष्कर्जी आहे. तसेच सदर जमीनीचे लिगल टायटल व पड्शेशन त्यांचे आहे याबाबत त्यांनी आमचे अशिल यांना विश्वास हमी व भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीविषयी कोणत्याही व्यक्तीचा वरील मिळकतीबाबत काही कायदेशीर मालकी कब्जेवहिवाट, तसेच काही अधिकार असल्यास तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचे बक्षीसपत्र, गहाणपत्र, लिन डिड, लिज डिड, साठेखत शर्तखरेदीखत, मृत्युपत्र इत्यादी हक्क व अधिकार असल्यास तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे सहकारी बँकेचे, सोसायटी अथवा पतसंस्था किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेचे तसेच हिंदु वारसा कायदयाप्रमाणे वारसा हक्क, पोटगी हक्क, तसेच इतर कोणतेही हक्क व अधिकार असल्यास त्याबाबत संबंधित इसम अथवा संस्थेने त्याबाबतची सर्व कागदपत्रे व पुराव्यानिशी ८ दिवसाच्या आमच्या कार्यालयात येवुन तशी खात्री पटवुन द्यावी. अन्यथा कोणत्याही संस्थेचे अगर व्यक्तीची हरकत नाही असे समजुन आमचे अशिल हे वर नमुद मिळकतीचा व्यवहार करुन घेतील व त्यानंतर कोणत्याही व्यक्तीची अथवा संस्थेची तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, मग त्याचे होणारे परिणामाची जबाबदारी आमचे अशिलावर राहणार नाही.

ही जाहीर नोटीस दिली असे.

नेवासा
दिनांक:-१९/१०/२०२६

**ॲड.डि.आर.धिर्डे**
**नेवासा कोर्ट**
**मोबा नं.८८३०३३१६४२**

## दिव्यांग बांधवांना संजय गांधी समितीवर प्रतिनिधित्व देणार : आ. खताळ

### हजारो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : दिव्यांग बांधवांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या समितीवर प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच शासकीय योजनांचा लाभ घेताना त्यांची कोणत्याही प्रकारे अडवणूक होऊ नये, यासाठी प्रशासनाला सूचना दिल्या आहेत, अशी ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली. संगमनेर शहरातील मातोश्री लॉन्स येथे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रमेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यासह पठार भागातील हजारो कार्यकर्ते, महिला, तरुण आणि दिव्यांग बांधवांनी आमदार खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

आमदार खताळ म्हणाले, संजय गांधी समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना दिव्यांग बांधवांची अनेक प्रकरणे मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न केले. रेशनकार्डसह शासकीय योजनांबाबतच्या अडचणी सोडविण्यासाठीही पुढाकार घेतला. दिव्यांग बांधवांच्या वतीने एका प्रतिनिधीला समितीवर शासकीय सदस्य म्हणून संधी मिळावी, यासाठी प्रयत्न करणार आहे. शिवसेनेत प्रवेश केलेल्या दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याची जबाबदारी आता अधिक वाढली आहे. आदिवासी कुटुंबांतील विद्यार्थ्यांना आवश्यक दाखले मिळवून देण्यासाठी तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शिवसैनिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसीमधील त्रुटींमुळे लाभ बंद झालेल्या महिलांना पुन्हा संधी मिळावी, यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी आदिशक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा नीलम खताळ, रमेश काळे, शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, युवासेना उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, तालुकाप्रमुख सुशील शेवाळे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रमेश काळे यांनी नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना सन्मान देऊन त्यांच्या प्रश्नांसाठी काम करण्याचे आवाहन केले.

निशाणी नंबर : ०१
दिनांक :-१७/१०/२०२६
नेमलेली तारीख : १४/११/२०२६

**जाहीर नोटीस**

ॲड.एस.एच. चव्हाण
नेवासा कोर्ट

नेवासा येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग १ यांचे न्यायालयात
(कोर्ट नं.१)
इतर फौजदारी चौकशी अर्ज नंबर २२८/२०२६

अर्जदार : बंडेराव त्र्यंबकराव गायकवाड, वय-७५, धंदा-सेवानिवृत्त,
रा. प्लॉट नं.१९, सहकार नगर, सपकाळ हॉस्पिटल जवळ, सावेडी, अ.नगर, ता.जि.अ.नगर

सा.वाले : ग्रामविकास अधिकारी साहेब, ग्रामपंचायत कार्यालय कुकाणा, ता. नेवासा, जि.अ.नगर

ज्याअर्थी नेवासा न्यायालयात इतर फौजदारी चौकशी अर्ज नंबर २२८/२०२६ अर्जदार बंडेराव त्र्यंबकराव गायकवाड, यांनी जन्म / मृत्यु कायदा १९६९ कलम १३ (iii) अन्वये अर्जदार यांचा मुलगा सागर बंडेराव गायकवाड याचा जन्म हा मौजे कुकाणा, ता. नेवासा येथे दिनांक ०१/०७/१९८१ रोजी झाला असून त्याचे जन्माची नोंद होण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जदार यांनी केलेल्या अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा वकिलामार्फत हजर होवून हरकती कराव्यात. योग्य मुदतीत कुणीही हरकत या न्यायालयात न दाखविल्यास सदर कोर्ट अर्जदाराचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेवून त्याचा जन्म/ मृत्युची तारखेचा हक्क सिद्ध झाल्यास मे. कोर्ट अर्जदाराचे हक्कात आदेश करील.

नेवासा
दिनांक :-१७/१०/२०२६

शिक्का

**आदेशावरुन**
**सहा. अधीक्षक**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**नेवासा**

निशाणी नंबर : ७
दिनांक : १३/१०/२०२६
नेमलेली तारीख २७/११/२०२६

**जाहीर नोटीस**

ॲड.व्ही.एम.गोरे
नेवासा कोर्ट, मो नं.९५१५५६९८७८

२ रे नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब, सि.डी यांचे कोर्टात
वारस चौकशी अर्ज नं. ११५/२०२६

अर्जदार---१. सोपान साहेबराव पाटेकर, वय ५२, धंदा शेती
२. संतराम साहेबराव पाटेकर, वय ५८, धंदा शेती, दोघे रा. गेवराई ता. नेवासा जि.अ.नगर
३. सुमन देविदास खाटीक, वय ५५, धंदा शेती, रा. पाथरवाला ता. नेवासा जि.अ.नगर

सामनेवाले---कुणीही
नाही मयत

हौसाबाई साहेबराव पाटेकर मयत दिनांक ०७/१२/२०२५

वरील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मे. न्यायालयामध्ये मयतास वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला असून मयत हौसाबाई साहेबराव पाटेकर दि. ०७/१२/२०२५ रोजी मौजे गेवराई ता. नेवासा येथे मयत झालेली आहे. त्यांना अर्जदार हेच वारस आहेत. मयत हौसाबाई साहेबराव पाटेकर यांचे नावावर मौजे गेवराई ता. नेवासा येथे मयताचे नावावर प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल ID MH०९००४१४१४१६६ असा पंचायत समिती नेवासा यांचे मार्फत एकुण रक्कम रुपये १,५८,७३०/- चा अनुदान मंजुर झालेला होता व आहे. यापैकी मयत हौसाबाई साहेबराव पाटेकर यांचे बँक ऑफ महाराष्ट्र शाखा कुकाणा ता. नेवासा येथील खाते नं.६०१९०७१५०३ मध्ये मयत हे हयात असतांनी रक्कम रुपये १५०००/- जमा झालेले आहे. अशी सर्व परिस्थीती असतांना अर्जदार हे मयताचे नावावरील घरकुलाचे लाभ घेण्यासाठी गेले असता ग्रामपंचायत कार्यालय गेवराई यांनी अर्जदार यांना स्पष्ट सांगितले की, आम्हाला मा. कोर्टाचे वारस प्रमाणपत्र (हेअरशिप) आणून दवा, त्यानंतर सदर घरकुलाचा लाभ घेता येईल त्यावेळी ग्रामपंचायत गेवराई यांनी दिनांक ०४/०८/२०२६ रोजी सदर

अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र सादर करणेबाबत सांगितले आहे. म्हणून अर्जदार यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र सादर करावयास सांगितले, म्हणून सदरचा अर्ज अर्जदार यांनी दाखल केलेला होता व आहे.

त्याअर्थी सदरील वादासंबंधी कुणाचेही काही एक म्हणणे किंवा कुणाची काही एक हरकत असेल तर या जाहीर नोटीस प्रसिध्द तारखेपासून दि २७/११/२०२६ रोजी पर्यंत किंवा ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर वकिलामार्फत सर्व कागदप्त्रानिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकूम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/१०/२०२६ रोजी माझी सही निशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी नोटीस दिली असे.

नेवासा
नेमलेली तारीख २७/११/२०२६

शिक्का

**क. लिपीक**
**दिवाणी न्यायालय, क स्तर**
**नेवासा**

**हुकूमावरुन**
**सहा-अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क स्तर**
**नेवासा**

## पान १ वरुन

### शनैश्वराच्या दानपेटीत ३५ लाखांहून अधिक रोख रक्कम

अर्पण करणाऱ्या भाविकांच्या देणगीतून दानपेट्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर रक्कम जमा होते. या पार्श्वभूमीवर देवस्थान प्रशासनाकडून शुक्रवारी दानपेट्या उघडून त्यातील रोख रक्कम आणि मौल्यवान वस्तूंची मोजणी करण्यात आली.मोजणीदरम्यान दानपेट्यांमध्ये एकूण ३३ लाख १६ हजार रुपयांच्या नोटा, तर २ लाख ४६ हजार ५०० रुपयांची चिल्लर आढळून आली. अशा प्रकारे रोख रकमेची एकूण बेरीज ३५ लाख ४२ हजार १५२ रुपये झाली. याशिवाय भाविकांनी अर्पण केलेले ३१ हजार ९६० रुपये किमतीचे सोने आणि १२ हजार १५५ रुपये किमतीची चांदीही प्राप्त झाली. सीसीटीव्हीच्या निगराणीखाली मोजणी दानपेट्यांतील रकमेची मोजणी पारदर्शक पद्धतीने व्हावी, यासाठी संपूर्ण प्रक्रिया सीसीटीव्हीच्या निगराणीखाली पार पडली. देवस्थानच्या लेखा विभागाकडून मौल्यवान वस्तूंची नोंद घेण्यात आली. तसेच उदासी महाराज मठात दानपेट्यांतील रकमेची मोजणी करण्यात आली. संपूर्ण प्रक्रियेचे सीसीटीव्हीच्या माध्यमातून निरीक्षण करण्यात आले असून, मोजणीचे व्हिडिओ चित्रीकरणही करण्यात आले.

### गुन्हा दाखल झाल्यानंतरही ७१ महिलांना आरोपींकडून त्रास

कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. या मोहिमेत महिला पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे यांच्यासह बेबी शिंदे, सविता उंदरे, पूनम मंतोडे, रूपाली लोहाळे, शिवानी देशमुख, निशिगंधा कोळसे, वैष्णवी दहिटणेकर, तेजल अभंग आणि अर्चना अहिरे यांनी सहभाग घेतला.

### 'दहा हजार मते बाद होतात, तर पदवी कोणी दिली?'

महाराष्ट्रातील उद्योग आणि गुंतवणुकीविषयी बोलताना फडणवीस म्हणाले की, मागील वर्षी राज्यात सुमारे ३० लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार झाले. परकीय गुंतवणुकीतही महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे. राज्यात नवे उद्योग आणून तरुणांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देणे, हे सरकारचे प्राधान्य आहे. उद्योगवाढी मुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत असून महाराष्ट्राची औद्योगिक क्षेत्रातील आघाडी कायम ठेवण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा उल्लेख करताना त्यांनी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे सांगितले. पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागात पाणी पोहोचवण्याचे काम महायुती सरकारने केले आहे. शेतकऱ्यांचे वीजबिल माफ करण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे. संकटाच्या काळात शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. प्रचारसभेपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपचे प्रदेश सचिव शरद लाड यांच्या निवासस्थानी भेट दिली. पुण्यात चुरशीची लढत –पुणे शिक्षक मतदारसंघातून महायुतीने कौस्तुभ गावडे यांना, तर पदवीधर मतदारसंघातून स्मिता जाधव यांना उमेदवारी दिली आहे. महाविकास आघाडीकडून शिक्षक मतदारसंघात विद्यमान आमदार जयंत आसगावकर, तर पदवीधर मतदारसंघात हर्षदा जाधव–देशमुख निवडणूक रिंगणात आहेत. शिक्षक मतदारसंघात अपक्ष उमेदवार दत्तात्रय सावंत आणि सचिन सानप यांनीही प्रचारात जोर लावला आहे. त्यामुळे पुण्यातील दोन्ही मतदारसंघांतील लढतींकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### सव्वादोन कोटींचा प्रश्न ऐरणीवर!

टाकळीभान येथील कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेत सहकार विभागाने सोमवारी (दि. १९ ऑक्टोबर) सेवा संस्थेत बैठक घेतली. सहाय्यक निबंधक तात्यासाहेब भोसले आणि सहकार अधिकारी डी. डी. वाकचौरे यांनी शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी टाकळीभान जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे शाखाधिकारी क्षीरसागर उपस्थित होते. श्रीरामपूर येथे झालेल्या टंचाई आढावा बैठकीत राष्ट्रवादी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे टाकळीभानमधील कर्जमाफीपासून वंचित शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर विखे पाटील यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. सेवा संस्थेचे कर्मचारी आणि संबंधित बँकेच्या अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. या पार्श्वभूमीवर सहकार विभागाने शेतकऱ्यांची बैठक घेऊन पुढील कार्यवाहीबाबत भूमिका स्पष्ट केली.

राजेंद्र कोकणे यांनीही अधिकाऱ्यांनी या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालून शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. तर कान्हा खंडागळे यांनी इतर थकीत कर्जदारांना कर्जमाफीचा लाभ मिळालेला असताना या ११२ शेतकऱ्यांना तो का मिळाला नाही, असा सवाल उपस्थित केला.

सेवा संस्थेचे अध्यक्ष राहुल पटारे यांनी कर्जमाफी प्रकरणातील सर्व बाबींची शहानिशा करून वंचित शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत लेखी सूचना केली. विशेष म्हणजे, कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्यांमध्ये अध्यक्ष पटारे यांच्या बंधूंचाही आणि मातोश्रींचाही समावेश असल्याचे सांगण्यात आले.

या ११२ शेतकऱ्यांना नियमानुसार कर्जमाफीचा लाभ मिळाल्यास सेवा संस्थेला सुमारे सव्वादोन कोटी रुपयांची रक्कम मिळू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांसह संस्थेच्याही आर्थिक हिताचा हा प्रश्न बनला आहे. आता चौकशी आणि लेखापरीक्षणातून नेमके काय निष्पन्न होते, याकडे टाकळीभान परिसराचे लक्ष लागले आहे.

बैठकीला माजी सरपंच भाऊसाहेब मगर, भाऊसाहेब पवार, माजी उपाध्यक्ष अविनाश लोखंडे, माजी अध्यक्ष एकनाथ पटारे, संचालक विजय कोकणे, संस्थेचे सचिव रामदास ब्राह्मणे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, शेतकरी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## श्रीगोंदा-कर्जतमधील घरफोडी करणारी टोळी जेरबंद ! तीन घरफोड्यांसह दोन चोरीचे गुन्हे उघडकीस, तिघे फरार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा आणि कर्जत तालुक्यात घरफोड्या व चोऱ्या करून पोलिसांना आव्हान देणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पाच गुन्हे उघडकीस आले असून, मुख्य आरोपीसह त्याला चोरीचे दागिने विक्री करण्यास मदत केल्याच्या आरोपावरून दोघांना आणि त्याच्या पत्नीलाही ताब्यात घेण्यात आले आहे. दरम्यान, गुन्ह्यांत सहभागी असल्याचे समोर आलेले दोन साथीदार फरार आहेत.

श्रीगोंदा शहरातील मांडवगण रोडवरील आळेकर मळा परिसरात २७ ऑगस्ट २०२६ रोजी नितीन पोपट रोही यांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली होती. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार, योगेश हिवऱ्या काळे (वय २०, रा. बिटकेवाडी, ता. कर्जत) याला नेवासा तालुक्यातील गिडेगाव परिसरातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने साथीदारांच्या मदतीने श्रीगोंदा आणि कर्जत तालुक्यांत गुन्हे केल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

**पाच गुन्ह्यांचा उलगडा** पोलिसांच्या माहितीनुसार, श्रीगोंदा पोलीस ठाण्यातील तीन घरफोडीचे, तर कर्जत पोलीस ठाण्यातील दोन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. या गुन्ह्यांत एसआरप्या शिंदुश्या काळे (रा. बिटकेवाडी, ता. कर्जत) आणि गवळीनाथ शांतीलाल काळे (रा. वाकी, ता. आष्टी, जि. बीड) यांचा सहभाग असल्याचे तपासात समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. हे दोघे सध्या फरार आहेत.

**सोन्याचे दागिने विकल्याचे तपासात उघड** चोरी केलेल्या दागिन्यांपैकी काही दागिने पत्नी अजाला योगेश काळे हिच्याकडे दिल्याची, तर काही दागिने दीपक सुभाष कपिले (रा. सलबतपूर, ता. नेवासा) याला विकल्याची माहिती योगेशने दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर पोलिसांनी अजाला काळे आणि दीपक कपिले यांना ताब्यात घेतले.

पंचांसमक्ष केलेल्या कारवाईत २७ हजार ५०० रुपये किमतीचे, एकूण १ ग्रॅम ८२० मिलीग्रॅम वजनाचे सोन्याचे लटकन व मुरणी जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे श्रीगोंदा आणि कर्जत तालुक्यांतील चोरीच्या घटनांच्या तपासाला महत्त्वाची दिशा मिळाली आहे.

**पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई** पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक हरीश भोये आणि पोलीस अंमलदार राहुल डरके, श्यामसुंदर जाधव, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, प्रताप देवकाते, अरुण मोरे, भाग्यश्री भिटे व ज्योती शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली.




## सडे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी नितीन बारहाते बिनविरोध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव मतदार संघातील सडे ग्रामपंचायतीच्या विद्यमान उपसरपंच सौ. अनिता संतोष बारहाते यांनी रोटेशननुसार आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे लोकनियुक्त सरपंच सौ.आशाताई सूर्यभान बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या रिक्त उपसरपंच पदासाठीच्या निवडणुकीत नितीन अंकुश बारहाते यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहत आलेल्या ग्रामविकास अधिकारी भाऊसाहेब थोरात यांनी नितीन अंकुश बारहाते यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

याप्रसंगी नवनिर्वाचित उपसरपंच नितीन बारहाते यांचा सरपंच व सर्व सदस्यांनी सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते बापूराव बारहाते, अशोक बारहाते, सडे ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ.आशाताई बारहाते, अनिल बारहाते, ग्रामपंचायत सदस्य सौ. मीरा बारहाते, सिद्धार्थ मोकळ, गणेश बारहाते, विजय बारहाते, सतीश बारहाते, सुनील बारहाते, रमेश वाकचौरे, संजय बारहाते, छबुराव बारहाते, प्रभाकर बारहाते, संतोष बारहाते, दिगंबर लोहकणे, संदीप बारहाते, सागर बारहाते, सुदाम बारहाते, योगेश बारहाते, सुभाष बारहाते, पोपट बारहाते, दिपक बारहाते,गोकुळ बारहाते आदी मान्यवरांसह ग्रामस्थ ग्रामपंचायत कर्मचारी सागर बारहाते, साक्षी पाडेकर उपस्थित होते. नवनिर्वाचित उपसरपंच नितीन बारहाते यांचे माजी आमदार अशोकराव काळे, आमदार आशुतोष काळे यांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. सडे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी काम करण्याची संधी दिल्याबद्दल नवनिर्वाचित उपसरपंच नितीन बारहाते यांनी सर्वांना सोबत घेऊन सडे गावाच्या विकासाला नवी दिशा देण्यासाठी आणि ग्रामस्थांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.




## द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये दांडिया नाईटचा जल्लोष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी:** भारतीय संस्कृतीचा मानबिंदू असलेल्या नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये दांडिया नाईट स्पर्धेचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले. पारंपारिक वेशभूषा, तालबद्ध संगीत आणि रंगतदार नृत्याने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

या कार्यक्रमात शाळेच्या विद्यार्थ्यांसह पालकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपल्या नृत्यकलेचे सादरीकरण केले. रंगबिरंगी चनिया-चोली, केडिया, आकर्षक दागिने आणि हातातील दांडियाच्या काठ्यांनी विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. डीजे च्या तालावर सुरू असलेल्या गरबा आणि दांडियाच्या ठेक्यावर सर्वांनीच ठेका धरला होता.

कार्यक्रमाच्या वेळी बोलताना संस्थेच्या संचालिका प्राजक्ताताई दंडवते म्हणाल्या, ''महिलांचा सन्मान, संस्कृतीचे जतन आणि आनंदाची निर्मिती हेच आमचे ध्येय आहे. केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर आपल्या सण-उत्सवांची परंपरा, त्यामागील संस्कार विद्यार्थ्यांना कळावेत, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने आम्ही दरवर्षी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करतो.''त्या पुढे म्हणाल्या की, शालेय जीवनात अभ्यासाबरोबरच कला, क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, शिस्त, संघभावना आणि व्यक्तिमत्व विकास साधला जातो. सर्वोत्कृष्ट वेशभूषा, सर्वोत्कृष्ट नृत्य आणि सर्वोत्कृष्ट समुह नृत्य अशा विविध गटात बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमास संस्थेच्या मार्गदर्शक कल्पनाताई दंडवते, संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, श्रावणीताई दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर सेवक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वंदना सिंग व आरती सोमासे यांनी अतिशय खुमासदार शैलीत केले तर आभार प्राचार्या अनिता रोहोम यांनी मानले.



## दारू उधारीवर न दिल्याने व्यावसायिकाला बेदम मारहाण : आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राशीन** : राशीन (ता. कर्जत) येथे दारू उधारीवर देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून एका व्यावसायिकाला मारहाण झाल्याची तक्रार कर्जत पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. या प्रकरणी आठ जणांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. संबंधित व्यावसायिकाच्या बरगडीला फ्रॅक्चर झाल्याने तो गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर बारामती येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**उधारीवरून वाद झाल्याची तक्रार** याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की , राशीन येथील देशी दारू दुकान व परमिट रूमचे व्यावसायिक श्रीनिवास रंगय्या सुरगोणी हे ४ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास दुकानासमोर उभे असताना काही व्यक्तींनी उधारीवर दारू मागितली. यापूर्वीची उधारी बाकी असल्याने दारू देण्यास नकार दिल्यानंतर वाद झाल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे. त्यानंतर दुकानाबाहेर काही व्यक्तींनी आपल्याला लाथाबुक्क्यांनी तसेच लाकडी काठीने मारहाण केल्याचा आरोप सुरगोणी यांनी फिर्यादीत केला आहे. या घटनेत चेहरा व छातीला दुखापत झाली असून, डाव्या बाजूची बरगडी फ्रॅक्चर झाली आहे.

**उपचारानंतर पोलिसांत फिर्याद** घटनेनंतर जखमी व्यावसायिकाला उपचारासाठी बारामती येथील देशपांडे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असल्यामुळे फिर्याद नोंदविण्यास विलंब झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यानंतर १२ ऑक्टोबर २०२६ रोजी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. या गुन्ह्याच्या अधिक तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल मारुती गुलाब काळे करीत आहेत. **तपासातून वस्तुस्थिती स्पष्ट होणार** या घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून संबंधित व्यक्तींचे जबाब, वैद्यकीय कागदपत्रे आणि इतर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे तपास केला जात आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर या प्रकरणातील नेमकी वस्तुस्थिती तपासातून स्पष्ट होणार असून, संबंधितांवरील आरोपांची सत्यता पुढील तपासानंतरच निश्चित होईल.




## नामात रंगून जाणे हाच मानवी जन्माचा खरा उद्धार :

### ह.भ.प. श्रावणी महाराज बडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर**, माणूस आज पैसा, प्रसिद्धी आणि प्रपंचात गुंतला आहे; मात्र हे सर्व क्षणिक आहे. संसाराचे रंग काळानुसार फिके पडतात, परंतु भगवंताच्या नामाचा रंग कायम टिकतो. संतसंगतीत राहून नामस्मरण करणे आणि भक्तीचा आनंद अनुभवणे, हाच मानवी जन्माचा खरा उद्धार आहे, असे प्रतिपादन बाल कीर्तनकार ह.भ.प. श्रावणी महाराज बडे यांनी केले. खंडाळा येथे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित जगदंबा माता नवरात्र कोजागिरी महोत्सवांतर्गत माँसाहेब मीनाताई बाळासाहेब ठाकरे राज्यस्तरीय महिला कीर्तन महोत्सवाच्या सातव्या दिवशी त्या बोलत होत्या. यावेळी महाराजांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या 'कुळीची हे कुळदेवी, केली ठावी संतांनी' या अभंगाचे निरूपण केले. प्रत्येक कुळाची रक्षक असलेली कुळदेवी ही आपल्या परंपरेचे आणि मूळ शक्तीचे प्रतीक आहे. संतांच्या सहवासातूनच मानवाला कुळदेवीचे महत्त्व आणि भक्तीचा खरा मार्ग समजतो. भगवंताच्या चरणी अनन्यभावाने शरण गेल्यास संकटांचा सामना करण्याचे बळ मिळते.

## जय भवानी मित्र मंडळाच्या पैठणीच्या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा फाटा येथील राजमुद्रा चौकातील श्रीनाथ प्रतिष्ठानच्या जय भवानी मित्र मंडळाने नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने आयोजित होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.नेवासा येथील ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्रा.देविदास साळुंके यांच्या बहारदार सूत्रसंचालनाने कार्यक्रमाला खरी रंगत आणली. यावेळी झालेल्या होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमात महिलांना प्रश्न विचारण्यात आली. यामध्ये हास्याचा कल्लोळ दिसून आला.महिलांनी या खेळात मनमुराद आनंद लुटला.या स्पर्धेत वैशाली तोत्रे मॅडम यांनी पैठणीसह प्रथम क्रमांकाचे वॉटर फिल्टर मशीन बक्षीस रूपाने पटकावले तर निकिता भोसले (वॉशिंग मशीन)द्वितीय,निशा लहू काकडे १ ग्राम ज्वेलरी तृतीय,बज्रानेश्वरी खेमनर पैठणी साडी, दांडिया सेट चतुर्थ,समीक्षा गाडेकर पैठणी साडी दांडिया सेट पाचवा क्रमांक यांनी विजेतेपद पटकावले या स्पर्धेतील विजेत्यांना मंडळाचे अध्यक्ष लखन भाऊ पारधी, उपाध्यक्ष निलेश भाऊ निपुंगे,अनिल डावखर, रामभाऊ पारधी, पुनित शिंदे, अमोल पवार, सागर चव्हाण, ऋषिकेश पारधी,ऋषिकेश बोरुडे,राजू कुसळकर, ज्ञानेश्वर माटे,आदित्य निपुंगे,सुमित रोकडे, रोहित मोरे, प्रसाद खोमणे, प्रथमेश लिपाने,यश वांडेकर, अतुल पेचे, अभी शिरसागर,शिवम खेमनर,प्रतीक निपुंगे, सुभाष जाधव,श्रीनिवास राजगुरू यांच्या उपस्थितीत पारितोषिके देण्यात आली.



## निधनवार्ता

### कमलताई वहाडणे



**पुणतांबा** : येथील श्रीमती कमलताई विजयराव वहाडणे (वय ७८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्यामागे चार मुली, जावई, नातवंडे सहा पुतणे असा परिवार आहे. शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख सुहास वहाडणे यांच्या त्या चुलती होत.

### नंदा बुगदे



**श्रीरामपूर** - शहरातील धार्मिक कार्यात अग्रेसर असलेल्या नंदा नंदकुमार बुगदे यांचे वयाच्या ७० व्या वर्षी नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांचे पश्चात दोन मुले, मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. पुणतांबा ग्रामीण रूग्णालयाचे औषध निर्माण अधिकारी निशिकांत बुगदे व छत्रपती संभाजीनगर येथील गव्हर्नमेंट पॉलिटेक्निकचे वरिष्ठ लिपीक नितीन बुगदे यांच्या त्या मातोश्री होत.

### कमल वहाडणे



**पुणतांबा** : येथील कमल विजयराव वहाडणे (वय ७८) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले त्यांच्या पश्चात चार मुली पुतणे जावई सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख सुहास वहाडणे यांच्या त्या काकू होत्या.

## गोव्यात १३ ते २० डिसेंबरदरम्यान 'सेरेंडिपिटी कला महोत्सव'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक** : गोव्यातील कला आणि संस्कृतीचा अनोखा अनुभव घेण्याची संधी महाराष्ट्रातील कलाप्रेमींना मिळणार आहे. पणजी येथे १३ ते २० डिसेंबर २०२६ या कालावधीत आठ दिवसांच्या 'सेरेंडिपिटी कला महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. संगीत, नाटक, चित्रपट, दृश्यकला, हस्तकला, रचना आणि खाद्यसंस्कृती अशा विविध कलाप्रकारांचा संगम या महोत्सवात पाहायला मिळणार आहे.

मुंबई आणि गोवा यांच्यातील सांस्कृतिक संबंधांना उजाळा देणारे अनेक कार्यक्रम महोत्सवात सादर होतील. 'ईस्ट इंडियन म्युझिक कंपनी' आणि 'जिझस बँड' हे प्रमुख आकर्षण असणार आहे. अंकुर तिवारी यांनी संकलित केलेल्या या कार्यक्रमात मुंबईतील ईस्ट इंडियन समुदायाची पारंपरिक गीते आणि कोंकणी संगीत सादर केले जाणार आहे. याशिवाय स्वानंद किरकिरे यांचा 'बावरा लाइव्ह', तसेच ताबा चाके, सुदान आणि अन्य कलाकारांचे संगीत कार्यक्रम होतील. 'बी-साइड' या उपक्रमांतर्गत १६ ते १९ डिसेंबरदरम्यानही विविध संगीत सादरीकरणे आयोजित केली आहेत.

नाट्यविभागात 'द क्वीन' या नाटकातून राणी दुर्गाची ऐतिहासिक कथा मांडली जाणार आहे. 'आनंद ही आनंद' या सादरीकरणातून चेतन आनंद, देव आनंद आणि विजय आनंद यांच्या जीवनकार्याचा वेध घेतला जाईल. 'बेली ऑफ द बीस्ट' या नाट्यप्रयोगात मातृत्वाच्या विविध टप्प्यांतील महिलांचे अनुभव उलगडले जाणार आहेत. 'ट्रान्झिएंट जिओग्राफीज' या प्रदर्शनातून जमीन, स्थलांतर, सीमा, श्रम आणि सामाजिक न्याय यांसारख्या विषयांवर प्रकाश टाकला जाणार आहे. तसेच स्नेहा खानवलकर आणि सुदर्शन शेट्टी यांनी साकारलेल्या 'आयज शॅल डीसिव्ह' या कलाकृतीत चित्रपट आणि ध्वनी यांचा अनोखा संगम अनुभवता येईल. सेरेंडिपिटी आर्ट्सचे संस्थापक सुनील कांत मुंजाल यांच्या मते, विविध कलाप्रकार, परंपरा आणि नव्या प्रयोगांमधून प्रेक्षकांना वेगळा कलानुभव देणे हा महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे डिसेंबरमध्ये गोव्याची सहल आखणाऱ्या कलाप्रेमींसाठी हा महोत्सव आकर्षण ठरणार आहे.



---

**सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६**

### नशिबाची परिक्षा
**मंगळवार दि. २० ऑक्टोबर २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत | |
|---|---|---|
| १२०<br>३४६<br>४९० | ३-७ | १२४<br>१७९<br>११५ |
| | | ३१-९७-६२-<br>०४-७५ |

**कल्याण**

| उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत | |
|---|---|---|
| १४७<br>२४६<br>६६० | २-४ | १५८<br>१४९<br>११२ |
| | | २६-०४-९१-<br>५८-४३ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत | |
|---|---|---|
| १५०<br>१६९<br>११४ | ६-३ | १३९<br>५८०<br>६७० |
| | | ६०-२३-७१-<br>४५-३९ |

**सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६**

### शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 27/07/2026 to 31/07/2026 | 25 59 | 60 | 55 50 | 59 00 | 42 | 22 28 | 35 58 | 62 | 39 00 | 40 00 | 47 | 89 00 | 16 60 | 70 | 48 88 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 23 34 | 90 | 56 69 | 17 70 | 85 | 15 59 | 33 38 | 42 | 12 29 | 46 60 | 09 | 47 78 | 37 70 | 05 | 34 48 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 57 77 | 99 | 23 34 | 23 30 | 53 | 14 48 | 25 50 | 70 | 23 35 | 35 55 | 39 | 13 35 | 13 33 | 76 | 35 58 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 24 40 | 60 | 46 60 | 27 78 | 73 | 34 46 | 11 16 | 82 | 48 80 | 15 56 | 23 | 77 79 | 44 49 | 77 | 17 79 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 36 60 | 96 | 79 00 | 25 55 | 23 | 22 29 | 78 89 | 42 | 23 37 | 45 50 | 98 | 44 40 | 26 66 | 41 | 29 90 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 14 49 | 43 | 67 70 | 17 70 | 81 | 56 00 | 15 59 | 52 | 33 36 | 69 90 | 50 | 23 35 | 57 77 | 99 | 13 35 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 68 80 | 47 | 55 57 | 22 28 | 27 | 12 24 | 57 00 | 26 | 35 58 | 11 12 | 43 | 77 79 | 44 45 | 33 | 68 89 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 78 89 | 47 | 12 24 | 33 36 | 20 | 13 16 | 79 99 | 56 | 17 78 | 68 80 | 42 | 34 45 | 39 39 | 16 | 79 00 |
| 21/09/2026 to 25/09/2026 | 39 00 | 25 | 34 48 | 45 57 | 62 | 12 29 | 48 00 | 23 | 59 99 | 16 66 | 30 | 47 79 | 15 00 | 60 | 28 00 |
| 28/09/2026 to 02/10/2026 | 66 69 | 19 | 13 35 | 13 37 | 18 | 27 79 | 26 00 | 84 | 25 57 | 66 60 | 29 | 12 26 | 36 69 | 84 | 77 70 |
| 05/10/2026 to 09/10/2026 | 14 00 | 57 | 25 00 | 45 59 | 85 | 16 88 | 13 00 | 48 | 56 67 | 46 69 | 99 | 12 26 | 55 58 | 84 | 59 00 |
| 12/10/2026 to 16/10/2026 | 16 00 | 79 | 56 68 | 29 00 | 11 | 66 99 | 12 22 | 58 | 18 89 | 13 00 | 46 | 12 23 | 25 57 | 42 | 48 00 |

| माधुरी बाजार डे | माधुरी बाजार नाईट |
|---|---|
| १४० | २९० |
| ५९ | १५ |
| ५५९ | ६९० |

# ‘जागर नारी शक्तीचा’ दांडिया नाईटचा जल्लोष

## हजारो महिलांनी घेतली ’ग्रीन सिटी’ची शपथ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर ड. धनंजय जाधव यांच्या विशेष प्रयत्नातून व दूरदृष्टीतून आयोजित ’जागर नारी शक्तीचा - दांडिया नाईट २०२६’ (व्हॉल्यूम ८.०) हा सोहळा अत्यंत भव्य, उत्साही आणि ऐतिहासिक वातावरणात पार पडला. दत्तात्रय जाधव नगर येथील बंधन लॉन्सच्या विस्तीर्ण प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमात शहराच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या हजारो महिलांनी दांडियाचा जल्लोष करत पर्यावरण संवर्धनाचा दृढ संकल्प केला.



या सोहळ्यात केवळ सांस्कृतिक रंगतच नाही, तर सामाजिक बांधिलकीचा संदेशही देण्यात आला. ना. राधाकृष्ण विखे पाटील ’ग्रीन सिटी’ (हरित अहिल्यानगर) मोहिमेची सविस्तर माहिती उपस्थित महिलांना देण्यात आली. अहिल्यानगर शहराला अधिक स्वच्छ, हरित व प्रदूषणमुक्त बनवण्यासाठी ’रणरागिणी मंडळा’च्या अध्यक्षा सौ. धनश्रीताई विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हजारो महिलांनी वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धनाची सामूहिक शपथ घेतली.

या सोहळ्यास ’रणरागिणी मंडळा’च्या सौ. धनश्रीताई विखे पाटील, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल अण्णा मोहिते, माजी महापौर बाबासाहेब वाकळे,नगरसेवक निखिल वारे,माजी उपमहापौर अनिल भाऊ बोरुडे, महिला बालकल्याण समितीच्या उपसभापती वर्षाताई सानप, नगरसेवक करण कराळे, महेश लोंढे, मोहित पंजाबी, सुमित लोंढे, जालिंदर कोतकर, रोहन सानप, पुष्कर कुलकर्णी, अभिजीत बोरुडे, नगरसेविका पुष्पा बोरुडे,गौरी बोरकर, संध्याताई पवार, शितल ढोणे, माजी नगरसेविका रूपाली वारे, महिला मोर्चाच्या प्रियाताई जानवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच शुभंकर कांबळे, स्वप्निल मुनोत, अमित फिरोदिया, राजेश गुगळे, निखिल लुनिया, तेजस कथडे, प्रताप काळे, नवजीवन फाउंडेशनचे पवार साहेब, भाजप चिटणीस स्वप्नील दगडे, व्यापारी आघाडीचे महेश गुगळे, युवा मोर्चाचे रुद्रेश अंबाडे, सिद्धार्थ मुथियान, मितेश शहा, राहुल मुथा आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले, सण व उत्सव हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून त्या माध्यमातून स्त्री शक्तीचा सन्मान आणि सामाजिक जागृती झाली पाहिजे, हाच आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. अहिल्यानगर शहराचा पायाभूत विकास करत असतानाच पर्यावरणाचा समतोल राखणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. आज हजारो महिला भगिनींनी घेतलेली ही शपथ अहिल्यानगरला हरित व सुंदर बनवण्यात मोलाची भूमिका बजावेल. शहराच्या विकासासाठी आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी आपण सदैव तत्पर राहू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत सर्वांनी सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनाचे कर्तव्य पार पाडावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## द•ख•ल

### सावली नर्सिंग कॉलेजची उज्ज्वल यशाची परंपरा कायम



**टाकळी ढोकेश्वर :** सावली प्रतिष्ठान संचलित सावली स्कूल ऑफ नर्सिंगने शैक्षणिक क्षेत्रातील उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखत प्रथम वर्षाचा १०० टक्के निकाल नोंदविला आहे. या परीक्षेत संस्थेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले असून, गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून संस्थेने पुन्हा एकदा आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे.या परीक्षेत बारकाबाई तिखोळे हिने ७७.८७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.मोनिका खुडे हिने ७४.६२ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक, तर कविता वाघ हिने ७४.५९ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.विद्यार्थिनींच्या या यशामुळे संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशामागे विद्यार्थिनींची मेहनत,सातत्यपूर्ण अभ्यास आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. विद्यार्थिनींना प्राचार्य शीतल गरकळ,प्रा. पुष्पा घुले आणि प्रा.पिंकी त्रिभुवन यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.भाऊसाहेब खिलारी,डॉ. स्वाती खिलारी,प्रा.नामदेव वाळुंज तसेच साई सावली हॉस्पिटलच्या सर्व कर्मचारी वृंदाने विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.या यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून,भविष्यातही विद्यार्थिनींनी अशीच यशाची परंपरा कायम ठेवावी अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

### शब्बीर शेख यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान



**कोरडगाव :** अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील कोरडगाव येथील मूळ रहिवासी असलेले शिक्षक शब्बीर बनेखा शेख यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६’ प्रदान करण्यात आला आहे. ॲस्पायर फाऊंडेशनच्या वतीने रविवार, दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ रोजी नाशिकमधील नांदूर नाका येथील ’संजीवनी ए. सी. बँक्वेट हॉल अँड लॉन्स’ येथे आयोजित करण्यात आलेल्या दिमाखदार सोहळ्यात त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते श्री. शेख यांना शाल, फेटा, श्रीफळ, सन्मानपत्र, ट्रॉफी व आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. शब्बीर बनेखा शेख यांनी शिक्षणासोबतच सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले असून, त्यांच्या या यशाने कोरडगाव गावाच्या व पाथर्डी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या या दैदिप्यमान यशाबद्दल कोरडगाव येथील ग्रामस्थ, तरुण मंडळे, विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस सर्वच स्तरातून मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### बोधेगाव जि प शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी झांबरे



**हातगाव :** राजकीय मतभेद बाजूला ठेवून लोकसहभागातून शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावावा, अशी अपेक्षा असंख्य पालकांनी व्यक्त केली असून याच भूमिकेतून शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी परमेश्वर झांबरे, तर उपाध्यक्षपदी अतुल बडे आणि हीना शेख यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या शाळेत चार वर्ग असून, सुमारे ३८० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. एका मुख्याध्यापकांसह १३ शिक्षक कार्यरत आहेत. मागील दोन वर्षांच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या माध्यमांतून तीन नवीन वर्गखोल्या बांधकाम. नवीन व जुन्या मिळून सहा खोल्यांमध्ये विद्युत जोडणी, शाळेच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, इन्व्हर्टर व बॅटरीची व्यवस्था तसेच सिमेंट ब्लॉक बसविणे संगणक प्रयोगशाळा उभारणे आणि विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी फिल्डर उपलब्ध करून देण्यात आला. शाळेतील १२ वर्गखोल्या डिजिटल करण्यात आल्या आहेत.या वेळी शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. शंकर गाडेकर, केंद्रप्रमुख प्रसाद सोनवणे, बालमटाकळीचे केंद्रप्रमुख ऋषिकेश राऊत, मुख्याध्यापक राजेंद्र बडे यांच्या उपस्थितीत निवड प्रक्रिया पार पडली. शिक्षक कुंडलिक काकडे, भाऊसाहेब वाघ, अशोक सोनवणे, अंजली चव्हाण, जयश्री राठोड, जयश्री पजई, संगीता गोल्हार, सरला शेटे, सीमा दारकुंडे, अनारकली गुळवे, बबन बर्डे यांनी निवड प्रक्रियेत सहभाग घेतला. यावेळी माजी सरपंच राम आंधारे, माजी अध्यक्ष आबासाहेब ढेसले, उपाध्यक्ष वृषभ गोरे, सुनील गायके, बाबा झांबरे, महेश घोरतळे, माणिक गर्जे, गणेश उगले, श्रीकांत घोरतळे, बाबा पठाण, बाबूलाल पठाण उपस्थित होते. सूत्रसंचालन महेश कराड तर कुंडलिक काकडे यांनी आभार मानले.

### जुन्या वादातून शेजाऱ्याला मारहाण; वडील व मुलावर हल्ल्याप्रकरणी गुन्हा

**अहिल्यानगर :** पिण्याच्या पाण्यासाठी जात असताना रस्त्यात बाजूला होण्यास सांगितल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीला व त्याच्या मुलाला दगड व बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना छत्तीसी (ता. जि. अहिल्यानगर) शिवारामध्ये घडली. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार, या प्रकरणातील फिर्यादी हे पिण्याचे पाणी आणण्यासाठी जात असताना आरोपी रस्त्यात पायी जात होता. त्यावेळी फिर्यादी यांनी आरोपीस रस्त्यातून बाजूला होण्यास सांगून तुला आमच्या गाडीचा धक्का लागेल, असे म्हटले. याचा राग आल्याने आरोपीने फिर्यादी यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तसेच तेवढ्यात जवळील एक दगड हातात उचलून फिर्यादी यांच्या गुडघ्यावर व डोक्यात मारून त्यांना दुखापत केली. यानंतर फिर्यादी घरी गेले आणि त्यांनी घडलेला सर्व प्रकार आपल्या मुलास सांगितला. त्यानंतर मुलगा छत्तीसी गावात जाऊन आरोपी यास विचारपूस करू लागला की, तू माझ्या वडिलांना का मारले? याचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादी यांच्या मुलालाही शिवीगाळ केली आणि हाताने बुक्क्यांनी मारहाण केली.

## बेडके दाम्पत्याच्या दातृत्वाने भापकर वस्ती शाळेला पाण्याच्या टाकीची भेट

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भापकर वस्ती येथे डॉ. विकास बेडके व डॉ. प्रतिक्षा बेडके यांनी शाळेसाठी दिलेल्या पाण्याच्या टाकीचा शुभारंभ आणि विद्यार्थी स्वागत समारंभ उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी महेश दहिफळे होते.



कार्यक्रमाची सुरुवात चिमुकल्या विद्यार्थिनींच्या सुरेल स्वागतगीताने झाली. यावेळी शाळेतील सुंदर व सुबक परिसर, आकर्षक परसबाग आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे विविध नाविन्यपूर्ण उपक्रम पाहून गटविकास अधिकारी महेश दहिफळे भारावून गेले. विद्यार्थ्यांमधील कलागुण आणि शिक्षकांचे प्रयत्न यांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

यावेळी बोलताना महेश दहिफळे म्हणाले, सत्ता येतात-जातात, पदे येतात-जातात; मात्र शेवटी शिल्लक राहते ती माणुसकी.. समाजासाठी पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मदत करणाऱ्या दानशूर व्यक्तींचे योगदान अनमोल असल्याचे सांगत त्यांनी डॉ. बेडके यांचे मनःपूर्वक आभार मानले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला सहाय्यक गटविकास अधिकारी श्रीराम चव्हाण, उमेश घेवरीकर, महेश डाळिंबकर, दादासाहेब भापकर, रोहिदास बोडखे, केंद्रप्रमुख रत्ना वैष्णव, कपिल पुलकंटवार, नामदेव धायतडक, रमेश गोरे, मुख्याध्यापिका आरती तागडे/घेवरीकर आणि उपक्रमशील शिक्षिका श्रीकांता शिंदे यांच्यासह मान्यवर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

दातृत्वाची साथ आणि शिक्षकांची तळमळ यांतून ग्रामीण शाळेच्या प्रगतीचा सुंदर आदर्श या कार्यक्रमाने घालून दिला.

## स्त्रियांचा आदर सन्मान करणे हेच नवरात्र : हभप वाणी महाराज

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :** प्रत्येकाने स्त्रियांचा आदर करणे सन्मान करणे हेच खरे नवरात्र असुन यावर्षी पाऊसाने वेळीच पाठ फिरविल्याने बळीराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडला असुन त्यासाठी दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना आधार दिलासा देणारे हरी किर्तन हेच प्रमुख साधन होय गरजुवंताना व मुलींना मदत करणे हीच देवीची उपासना आहे असे प्रतिपादन वैष्णव आश्रम ब-हाणपुरचे हभप निलेश महाराज वाणी यांनी बोलताना व्यक्त केले.



शेवगाव तालुक्यातील ढोरजळगांव येथील लांडे वस्ती येथील चौंढळादेवी मंदिर येथे आयोजित काल्याच्या किर्तनसेवेप्रसंगी हभप वाणी महाराज बोलत होते. यावेळी आठ दिवस हभप कांचनताई महाराज जिकठाणकर यांच्या वाणीतुन श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते रोज सायंकाळी भाविकांसाठी फराळाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी परीसरातील भाविक भक्तांनी व महिलांनी या श्रीमद् भागवत कथेचा लाभ घेतला.

हभप वाणी महाराज पुढे बोलताना म्हणाले की मानवी जीवन हे गती प्रधान संत जीवन बुध्दी प्रधान,तर भगवंतांचे जीवन विभुती प्रधान असुन सध्याच्या जीवनात मनुष्य धावत पळत असुन सामाजिक कर्तव्याचे भान राहिलेले नसुन आजही संत आपले आचार विचार समाजासाठी समर्पित करत असुन चांगल्या विचारांचा अंगीकार केल्यास चांगले फळ मिळते असे त्यांनी बोलताना सांगितले. किर्तनानंतर भाविकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## दसऱ्याला भगवानगडावर ऐतिहासिक सोहळा कृष्णा महाराज शास्त्री होणार चतुर्थ महंत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**भगवानगड ट्रस्टचा निर्णय ; दुष्काळामुळे सोहळा साधेपणाने**

**खरवंडी कासार :** श्री क्षेत्र भगवानगडाच्या स्थापनेला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत असून अमृत महोत्सवी वर्षात गडाला चतुर्थ मठाधिपती लाभणार आहेत. दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर ह.भ.प. श्री कृष्णा महाराज शास्त्री यांची चतुर्थ महंत म्हणून नियुक्ती होणार आहे.

१९५१ साली दसऱ्याच्या दिवशी ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबांनी भगवानगडाची स्थापना केली होती. विद्यमान मठाधिपती ह.भ.प. महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री बाबा यांनी दोन वर्षांपूर्वीच कृष्णा महाराज शास्त्री यांना उत्तराधिकारी म्हणून घोषित केले होते.

श्री कृष्णा महाराज शास्त्री हे मूळचे तेलंगणाचे असून १७ वर्षांपूर्वी भगवानगडावर आले. त्यांनी १२ वर्षे येथील ज्ञानेश्वरी विद्यापीठात डॉ. शास्त्री बाबांच्या मार्गदर्शनाखाली अध्ययन केले. त्यानंतर एकनाथवाडी येथील निरंजन संस्थानचे महंत म्हणून तीन वर्षे सेवा बजावली. एम.ए. पर्यंत शिक्षण झालेले कृष्णा महाराज शास्त्री हे अभ्यासू वृत्तीचे आहेत.

दरम्यान, यंदा दुष्काळी परिस्थिती असल्याने गादी सोहळा भव्य न करता साधेपणाने करण्याचा निर्णय भगवानगड ट्रस्टने घेतला आहे. तरीही या ऐतिहासिक सोहळ्याला लाखो भाविक उपस्थित राहणार आहेत.

गादी सोहळ्यानंतर विद्यमान मठाधिपती डॉ. नामदेव महाराज शास्त्री बाबा सामाजिक जीवनातून पूर्णपणे निवृत्त होणार असून ते उर्वरित आयुष्य ज्ञानेश्वरीच्या भावानुवाद लेखनासाठी अर्पण करणार आहेत. आज ते स्वतः विधिवत पद्धतीने कृष्णा महाराज शास्त्री यांना गादीवर बसवणार आहेत.

## अध्यात्मिक लाभासाठी नामस्मरणाचा मंत्र सर्वश्रेष्ठ : भगवान महाराज मचे



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** प्रत्येक मनुष्याला दैनंदिन आयुष्यात संकटाला तोंड द्यावे लागते त्या प्रयत्नातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नाही अशा प्रसंगात आध्यात्मिक लाभासाठी नामस्मरणाचा मंत्र सर्वश्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन हरेश्वर संस्थांचे मठाधिपती भगवान महाराज मचेयांनी शारदीय नवरात्र उत्सव सांगता सोहळ्यातील काल्याच्या कीर्तनात भाविकांना उपदेश करताना केले.

या नवरात्र उत्सव काळात सात दिवस ज्ञानेश्वरी पारायण तसेच दररोज कीर्तन सेवा अन्नदानहोत असे. महाराजांनी भक्तांना अनेक उपदेश देत शिराळ गावची एकी एक ऐक्याचे प्रतीक आहे असे महाराजांनी या एकीचे कौतुक केले शिराळ गाव देवीचा उत्सव म्हटला कीआनंद उत्सव साजरा करतात प्रत्येक जणदेवीची मनोभावे सेवा करतात. या सप्ताह काळात भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात सप्ताहाची सांगता महाप्रसादाने झालीउपस्थित सर्व भाविक भक्तांचे नवरात्र उत्सव कमिटीने आभार मानले

## अकोळनेर येथे जुन्या वादातून शेतकरी व सुनेवर काठीने बेदम मारहाण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अकोळनेर (कोळगेवाडी) येथे कौटुंबिक व पूर्व संचित कारणावरून झालेल्या वादानंतर आरोपींनी फिर्यादी शेतकरी आणि त्यांच्या सुनेला लाकडी काठीने आणि बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात दोन जणांविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दौलत रघुनाथ कोळगे (वय ५६, रा. अकोळनेर, कोळगेवाडी) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली असून, त्यावरून अक्षय जगन्नाथ कोळगे आणि सविता जगन्नाथ कोळगे (दोघेही रा. अकोळनेर, कोळगेवाडी) यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची सून ही घरी असताना आरोपींनी तिला विनाकारण अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. हा प्रकार पाहतात फिर्यादीने आरोपींना जा विचारणा केली असता, त्याचा राग आल्याने आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या सुनेला मारहाण केली. आरोपी अक्षय कोळगे याने फिर्यादीला जोरात धक्का दिल्याने ते खाली पडले. त्यानंतर त्यांच्या पाठीत, छातीवर व मांडीवर लाकडी काठीने मारहाण केली तसेच हाताने बुक्क्या मारल्या. तसेच आरोपी सविता कोळगे हिने देखील फिर्यादीस काठीने मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी आलेली फिर्यादीची सून यांनाही आरोपींनी काठीने हातावर व पायावर मारहाण करून गंभीर जखमी केले आणि जीवे मारण्याची धमकी दिली. या मारहाणीच्या दरम्यान फिर्यादीच्या सुनेच्या गळ्यातील ३ तोळ्यांचे सोन्याचे मंगळसूत्र गहाळ झाले आहे. घटनेची माहिती मिळताच नगर तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, जखमींवर पंडित हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे उपचार सुरू आहेत.

## रेणुका माता मंदिरात ‘होम मिनिस्टर’चा खेळ; ११ महिलांनी जिंकली पैठणी!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या वतीने दर्शनासाठी आलेल्या महिला भाविकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ‘होम मिनिस्टर रंगलेला हा खेळ पैठणीचा’ या मनोरंजनात्मक कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध मनोरंजनात्मक आणि बौद्धिक खेळांच्या माध्यमातून स्त्रीशक्तीचा जागर करण्यात आला. या कार्यक्रमात महिलांनी उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांची आणि कौशल्याची चुणूक दाखवली. विविध स्पर्धांमधील ११ विजेत्या महिलांना पैठणी, ३ सोन्याची नथ, मिक्सर यांसह आकर्षक बक्षिसे देण्यात आली.

श्री रेणुका माता देवस्थान परिसरात पार पडलेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली वाघमारे यांनी केले. त्यांनी विविध मनोरंजनात्मक आणि बौद्धिक खेळांच्या माध्यमातून महिलांना स्पर्धेत सहभागी करून घेतले. प्रत्येक फेरीत महिलांचा उत्साह वाढत होता. विविध खेळांमधील आव्हाने स्वीकारत महिलांनी स्पर्धेचा मनमुराद आनंद लुटला. कार्यक्रमाच्या निमित्ताने मंदिर परिसरात महिलांची मोठी गर्दी झाली होती. संपूर्ण परिसर उत्साहाने आणि आनंदाने गजबजून गेला होता.

संसाराच्या जबाबदाऱ्या सांभाळताना महिलांना स्वतःच्या आवडी-निवडी आणि कलागुणांसाठी फारसा वेळ मिळत नाही. हीच बाब लक्षात घेऊन महिलांना मनोरंजनाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विविध फेऱ्यांमधून महिलांची बौद्धिक क्षमता, चातुर्य, कौशल्य आणि समयसूचकता यांची कसोटी पाहण्यात आली. प्रत्येक फेरीत सहभागी महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत कार्यक्रमात रंगत आणली.



महिलांसोबत त्यांच्या मुलांनाही काही फेऱ्यांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. त्यामुळे कार्यक्रमाला कौटुंबिक स्वरूप प्राप्त झाले. महिलांनी एकमेकींना प्रोत्साहन देत विविध स्पर्धांचा आनंद घेतला. स्पर्धेतील चुरस, मनोरंजनात्मक खेळ आणि बक्षिसांची उत्सुकता यामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.

या कार्यक्रमातील विजेत्या महिलांसाठी विविध आकर्षक बक्षिसांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्या महिलेला पैठणी, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्या महिलेला सोन्याची नथ, तर तृतीय क्रमांकाच्या विजेत्या महिलेला मिक्सरचे बक्षिस देऊन गौरविण्यात आले. याशिवाय विविध फेऱ्यांमध्ये विजयी झालेल्या महिलांनाही आकर्षक बक्षिसे देण्यात आली. प्रत्येक फेरीच्या निकालानंतर विजेत्या महिलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. कार्यक्रम पाहण्यासाठी परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. देवस्थान ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांच्या पत्नींनीही या स्पर्धेत सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे आणि सचिन कोतकर यांच्या उपस्थितीत विजेत्या महिलांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. महिलांना आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून त्यांना विरंगुळा मिळावा, या उद्देशाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे महिला भाविकांनी कौतुक केले.

## दखल

### पदवीधर, शिक्षक निवडणुकीत पसंतीक्रमाने मतदान करा

पुणे : विधानपरिषदेच्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदान करताना मतदारांनी पसंतीक्रम नोंदविण्याची पद्धत समजून घेऊन मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले आहे. विधानपरिषद निवडणुकीत मतदानाची पद्धत अन्य सार्वत्रिक निवडणुकांपेक्षा वेगळी असते. या निवडणुकीत मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावासमोरील रकान्यात पसंतीक्रम नोंदवावा लागतो.

जांभळ्या पेनचाच वापर :

पसंतीक्रम आकड्यांमध्येच लिहावा. शब्दांमध्ये लिहिलेला पसंतीक्रम ग्राह्य धरला जाणार नाही. उमेदवाराच्या नावासमोर फुली, टिकमार्क किंवा अन्य खूण करू नये. मतपत्रिकेवर स्वतःचे नाव, आद्याक्षरे, स्वाक्षरी किंवा अन्य कोणताही मजकूर लिहू नये. अंगठ्याचा ठसाही उमटवू नये.

या चुका टाळा : मतपत्रिकेवर '१' हा आकडा न लिहिणे, एकापेक्षा अधिक उमेदवारांसमोर '१' लिहिणे, एकाच उमेदवारासमोर एकापेक्षा अधिक पसंतीक्रम नोंदविणे किंवा मतदाराची ओळख पटेल अशी खूण करणे, यामुळे मतपत्रिका अवैध ठरू शकते. पसंतीक्रमाचा आकडा कोणत्या उमेदवारासाठी आहे, याबाबत संदिग्धता राहणार नाही याचीही काळजी घ्यावी. मतपत्रिका वैध ठरण्यासाठी किमान एका उमेदवारासमोर '१' हा पसंतीक्रम नोंदविणे आवश्यक आहे. पुढील पसंतीक्रम देणे ऐच्छिक आहे. त्यामुळे मतदारांनी नियमांचे पालन करून योग्य पद्धतीने मतदान करावे, असे आवाहन निवडणूक प्रशासनाने केले आहे.

### ॲनोमली आणि नो-मॅपिंगच्या कामाला गती

**पुणे :** विशेष सखोल पुनरक्षण कार्यक्रमांतर्गत ॲनोमली आणि नो-मॅपिंगच्या कामाला गती देण्यात आली असून हे काम २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. जास्तीत जास्त पात्र मतदारांची नावे यादीत समाविष्ट होण्यासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांनी केले.

दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत आहे. प्राप्त झालेल्या दावे व हरकती १० नोव्हेंबर पर्यंत निकाली काढण्यात येणार आहेत. व १६ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित करण्यात येणार आहे. ३१ ऑगस्ट ते १८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ८६ हजार ६४३ फॉर्म नंबर ६, १ हजार ३१५ फॉर्म नंबर ७ आणि ३२ हजार २४३ फॉर्म नंबर ८ प्राप्त झाले असून या सर्व अर्जांवर १० नोव्हेंबर पर्यंत निर्णय घेण्यात येणार असल्याचे श्रीमती कळसकर यांनी सांगितले. तसेच २३ ऑक्टोबर २०२६ रोजी पुणे विभाग शिक्षक, पदवीधर मतदार संघासाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत कमी मतदार संख्या असणारे मतदान केंद्र नजीकच्या १६ किलोमीटरच्या आत असणाऱ्या दुसऱ्या मतदान केंद्रात समाविष्ट करण्यात आली आहेत. बदल करण्यात आलेल्या मतदान केंद्रांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पिंपि.सीं.ळप या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली असून राजकीय पक्षांनी याबाबत जास्तीत जास्त मतदारांना अवगत करावे, असेही आवाहनही श्रीमती कळसकर यांनी केले.

### मिशन लक्ष्यवेध अंतर्गत कुस्तीपटूंच्या निवड चाचणीचे आयोजन

**पुणे :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'मिशन लक्ष्यवेध' योजनेंतर्गत कुस्तीच्या राज्यस्तरीय हाय परफॉर्मन्स सेंटरसाठी पात्र खेळाडूंच्या निवड चाचण्यांचे आयोजन दि. २५ ते ३० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, पुणे येथील वेटलिफ्टिंग हॉलमध्ये करण्यात येणार आहे.

या निवड प्रक्रियेसाठी १७ ते २५ वर्षे वयोगटातील पात्र कुस्तीपटूंना सहभागी होता येणार आहे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय तसेच अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धांमध्ये पदक प्राप्त केलेले खेळाडू पात्र असतील. निवड प्रक्रियेत क्रीडा कौशल्य, शारीरिक क्षमता व वैद्यकीय चाचण्यांचा समावेश असेल.इच्छुक पात्र खेळाडूंनी दि. २४ ऑक्टोबर २०२६ पर्यंत http://foA°ms.gle/.747z7vzabxT4suaVv9 या लिंकवर ऑनलाइन नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी स्वजीत यादव यांच्याशी ७५०७०६७७७८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### सेवा संकल्प अभियानांतर्गत पुणे जिल्ह्यात कृषी विभागाची मोहिम

पुणे : महाराष्ट्र शासनाच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत पुणे जिल्ह्यात कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली.अभियानांतर्गत जिल्ह्यात ७ लाख २३ हजार ४५३ शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार करण्यात आले आहेत. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना २०१९ पासून आतापर्यंत १ हजार ९०८ कोटी रुपयांचा निधी थेट त्यांच्या खात्यांमध्ये वितरित करण्यात आला आहे. जिल्ह्यात या योजनेचे सुमारे ४.५९ लाख शेतकरी पात्र आहेत. शेतकऱ्यांना डिजिटल कृषी सेवा व मार्गदर्शन उपलब्ध करून देणारे 'महाविस्तार' ॲप आतापर्यंत २ लाख ८३ हजार ८६८ शेतकऱ्यांनी डाउनलोड केले आहे. तसेच प्रत्यक्ष शेती व शेतीपूरक व्यवसायात कार्यरत महिलांना कायदेशीर ओळख मिळवून देण्यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्राकरिता २ लाख ४२ हजार ४९८ अर्ज प्राप्त झाले आहेत.

# पुणे जिल्ह्यात २५ हजार एकरांवर चारा उत्पादनाचे नियोजन

## साडेपाच लाख टन चारा उत्पादनाचे उद्दिष्ट, टंचाईग्रस्त जिल्ह्यांनाही पुरवठा शक्य

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** संभाव्य दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कायम ठेवण्याबरोबरच चारा टंचाईग्रस्त जिल्ह्यांनाही मदत करता यावी, यासाठी पुणे जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले आहे. जिल्ह्यात सुमारे २२ ते २५ हजार एकर क्षेत्रावर चारा उत्पादनाचे नियोजन करण्यात आले असून, त्यातून सुमारे ५.५ लाख टन चारा उत्पादन अपेक्षित आहे. यासाठी नाविन्यपूर्ण योजनेतून निधी मंजूर करण्यात आला आहे. जिल्ह्यात सध्या उपलब्ध असलेला चारा सुमारे तीन महिने पुरेल इतकाच असल्याने चारा उत्पादन वाढविणे, बियाणे वितरण आणि चाऱ्याचे योग्य व्यवस्थापन यावर प्रशासनाने भर दिला आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली पशुसंवर्धन विभाग आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने हे नियोजन करण्यात येत आहे. सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांना चारा उत्पादनासाठी शंभर टक्के अनुदानावर बियाणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बियाणे वितरणाची प्रक्रिया पूर्ण झाली असून, येत्या आठ ते दहा दिवसांत बियाणे प्राप्त होणे अपेक्षित आहे. त्यानंतर तालुकास्तरावरील नियोजनानुसार शेतकऱ्यांना बियाणे वितरित करण्यात येणार आहे.

**सिंचन क्षेत्राचा प्रभावी वापर :**

जिल्ह्यातील वैयक्तिक शेती, गटशेती तसेच सिंचनाची सुविधा उपलब्ध असलेल्या क्षेत्रांमध्ये चारा लागवडीला प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रत्येक गावातील उपलब्ध सिंचन क्षेत्राचा वापर करून चारा उत्पादन वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. बियाणे पेरणीपासून प्रत्यक्ष उत्पादनापर्यंत नियमित देखरेख ठेवण्यात येणार आहे. हिरव्या चाऱ्याचे उत्पादन वाढविण्यासोबतच मुरघास निर्मितीवरही भर दिला जाणार आहे. त्यामुळे चारा उपलब्ध असताना त्याचे योग्य संवर्धन करून पुढील काळातही पशुधनासाठी चारा उपलब्ध ठेवता येईल.

**पशुवैद्यकीय दवाखानानिहाय प्रात्यक्षिके :**

चारा उत्पादन आणि पशुधनाच्या पोषणाबाबत शेतकरी व पशुपालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रत्येक पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात प्रात्यक्षिके आणि शेतकरी मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. एका पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात साधारणतः पाच ते दहा गावांचा समावेश असतो. या गावांतील ग्रामपंचायती, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ, शेतकरी आणि पशुपालकांच्या सहभागातून मार्गदर्शन करण्यात येईल.

सुका व हिरवा चारा योग्य पद्धतीने साठविणे, मुरघास तयार करणे, चाऱ्याची पौष्टिकता टिकवून ठेवणे तसेच जनावरांना आवश्यक खनिजद्रव्ये आणि पूरक पोषण योग्य प्रमाणात देणे, याबाबत प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून माहिती दिली जाणार आहे. चाऱ्याची गुणवत्ता वाढवून पशुधनाचे आरोग्य आणि उत्पादकता टिकविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

**जिल्ह्यात सुमारे १८.७ लाख पशुधन:**

जिल्ह्यात दीड वर्षांपेक्षा अधिक वयाचे सुमारे सात लाख २४ हजार ९०० मोठे पशुधन आहे. त्यामध्ये गायी व म्हशींचा समावेश आहे. याशिवाय सुमारे तीन लाख १० हजार ३२५ लहान पशुधन आणि आठ लाख ३५ हजार ५८९ शेळ्या व मेंढ्या आहेत. या पशुधनासाठी पुरेसा आणि पौष्टिक चारा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने उत्पादनाबरोबरच साठवण, संवर्धन आणि नियोजनबद्ध वापरावर भर देण्यात येत आहे.

**चारा टंचाईग्रस्त जिल्ह्यांनाही मदत:**

पुणे जिल्ह्यातील चारा उत्पादनातून स्थानिक गरज भागविण्याबरोबरच राज्यातील ज्या जिल्ह्यांना चाऱ्याची आवश्यकता असेल, त्यांनाही मागणीनुसार पुरवठा करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे संभाव्य दुष्काळी परिस्थितीत पशुपालकांना दिलासा मिळण्यास मदत होईल.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. राजेश कुमार वासनिक आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे चारा नियोजनासाठी समन्वयाने काम करीत आहेत. बियाणे वितरण, लागवड, उत्पादनाची देखरेख आणि चाऱ्याच्या उपलब्धतेचा नियमित आढावा घेण्यात येत आहे. चारा टंचाईचे संभाव्य संकट कमी करण्यासाठी प्रशासनाकडून सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे.

# टपाल विभागाच्यावतीने २७ ऑक्टोबरला पेन्शन अदालतीचे आयोजन

## २२ ऑक्टोबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** टपाल विभागातील निवृत्तिवेतनधारक तसेच कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनविषयक तक्रारींचे निवारण करण्यासाठी पुणे विभागाच्या टपाल कार्यालय अधीक्षक कार्यालयामार्फत मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

ही सभा शिवाजीनगर, पुणे येथील पुणे विभागाच्या टपाल कार्यालय अधीक्षक कार्यालयात होणार आहे.टपाल विभागातून निवृत्त झालेल्या किंवा सेवेत असताना निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतनविषयक लाभांशी संबंधित, तसेच पुणे टपाल विभागातील निवृत्तिवेतनधारकांच्या ज्या तक्रारी तीन महिन्यांच्या कालावधीत निकाली निघालेल्या नाहीत, अशा तक्रारींचाच यावेळी विचार करण्यात येणार आहे. या संदर्भातील तक्रारी २२ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

निवृत्तिवेतनधारकांनी आपली तक्रार विहित नमुन्यात दोन प्रतींमध्ये वैयक्तिकरीत्या सादर करावी. तक्रार इतरांच्या वतीने किंवा सामूहिक स्वरूपात सादर करू नये. तक्रारीचा विहित नमुना पुणे विभागाच्या टपाल कार्यालय अधीक्षक कार्यालयातील विभागीय लेखापाल किंवा लघुलेखक यांच्याकडे उपलब्ध आहे. तसेच dopunemuffasil.mhindiapost.gov.in या ई-मेल पत्त्यावरही तक्रार पाठविता येईल. वारसाहक्कासह इतर निव्वळ कायदेशीर बाबी, वेतनवाढीशी संबंधित प्रकरणे, धोरणात्मक बाबींशी संबंधित शिस्तभंगाची प्रकरणे तसेच विभागीय पदोन्नती समितीच्या (डीपीसी) निर्णयाच्या पुनर्विलोकनासाठी प्रलंबित असलेली प्रकरणे या सभेत विचारार्थ घेतली जाणार नाहीत, असे टपाल विभागाने कळविले आहे.



# धामणीत पाच गुणवंतांचा पुरस्काराने गौरव

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

**धामणी (आंबेगाव) :** कळमजाई देवी नवरात्रोत्सवात सातव्या माळेनिमित्त विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम गिरी करणाऱ्या पाच गुणवंतांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. माळीमळा येथील संत सावतामाळी प्रतिष्ठानच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

संत सावतामाळी प्रतिष्ठान गेल्या तेरा वर्षांपासून या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करत आहे. यंदा युवा उद्योजिका ॲड. सोनाली धामणीकर, शिक्षण क्षेत्रातील केशर जाधव, कृषी क्षेत्रातील पराग भूमकर, कला क्षेत्रातील श्रीराम विधाटे आणि धार्मिक क्षेत्रातील काळूराम विधाटे यांना पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. अशी माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक ज्ञानेश्वर विधाटे यांनी दिली.

# कलेक्टरच्या आदेशाला केराची टोपली

## कुरकुंभ एमआयडीसीची जलवाहिनी पुन्हा फुटली



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**यवत :** दौंड तालुक्यातील पाटस परिसरामध्ये गेल्या आठवड्यात दोन वेळा कुरकुंभ एमआयडीसीची मुख्य पाणीपुरवठा पाइपलाइन फुटल्याची गंभीर घटना घडली आहे. यामुळे लाखो लीटर पिण्यायोग्य पाणी वाया गेले असून, परिसरात पाण्याचे मोठे पाट वाहताना पाहायला मिळत आहेत. एकीकडे जिल्हाधिकारी साहेबांनी पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी आणि 'पाणी जपून वापरा' असे कडक आदेश दिलेले असताना, दुसरीकडे ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे या आदेशाला थेट केराची टोपली दाखवली जात असल्याचे चित्र आहे.

**वारंवार तक्रार करूनही ठेकेदार आणि अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. कलेक्टरच्या आदेशालाही हे जुमानता नाहीत. शासकीय मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या आणि नागरिकांचा जीव धोक्यात घालणाऱ्या या दोषी अधिकारी व ठेकेदारावर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे.**
**– संजय शिंदे, जय शिवसंग्राम संघटना अध्यक्ष दौंड तालुका**

**ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या ढिसाळ कारभारावर संताप...**

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, पाइपलाइनच्या देखभालीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे सुरू आहे. एकदा पाइपलाइन फुटल्यानंतर तिची तात्पुरती दुरुस्ती केली जाते, ज्यामुळे काही दिवसांतच ती पुन्हा दुसऱ्या ठिकाणी फुटते. या वारंवार होणाऱ्या प्रकारामुळे लाखो लीटर पाण्याचा अपव्यय तर होतच आहे, शिवाय परिसरातील रस्त्यांचे आणि शेतकऱ्यांच्या पिकांचेही मोठे नुकसान होत आहे. जिल्हाधिकारी प्रशासनाकडून नागरिकांना पाणी बचतीचे आवाहन केले जात असताना, शासकीय यंत्रणेच्या डोळ्यांदेखत होणारी ही पाण्याची नासाडी पाहून नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**कारवाईची जोरदार मागणी..**

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचा आदर न करता निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित ठेकेदारावर आणि कर्तव्यदक्षतेचा अभाव असलेल्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी आग्रही मागणी पाटस आणि कुरकुंभ परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे. वारंवार होणारी ही पाण्याची गळती थांबवून कायमस्वरूपी उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# आळंदीत भाविकांसाठी 'अमृत स्तंभ'; २० रुपयांत शुद्ध पाण्याने तीर्थस्नानाची सुविधा

## इंद्रायणीच्या प्रदूषित पाण्यावर पर्याय; सहा मिनिटांत १८ लिटर पाणी शुद्ध, नगर परिषदेचा अभिनव उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी देशभरातून आळंदीत येणाऱ्या भाविकांना इंद्रायणी नदीच्या प्रदूषित पाण्यामुळे तीर्थस्नानापासून वंचित राहावे लागत होते. भाविकांची ही अडचण दूर करण्यासाठी आळंदी नगर परिषदेने नदीघाटावरच 'अमृत स्तंभ' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. या सुविधेद्वारे अवघ्या २० रुपयांत शुद्ध पाण्याने स्नान करता येत असल्याने भाविकांना दिलासा मिळाला आहे.

इंद्रायणी नदीला धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व असून, आळंदीत येणाऱ्या वारकऱ्यांसाठी नदीस्नानाला विशेष श्रद्धास्थान आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातून नदीत मिसळणाऱ्या सांडपाण्यामुळे नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झाला आहे. परिणामी, नदीच्या पाण्यात स्नान करणे भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय ठरत होता. ही बाब लक्षात घेऊन नगर परिषदेने नदीघाटावरच पाणी शुद्ध करून स्नानासाठी उपलब्ध करून देण्याचा पर्याय पुढे आणला आहे.

भोसरी येथील दर्शन इंडस्ट्रीज इंटरनॅशनल प्रा. लि. या कंपनीने 'अमृत स्तंभ' ही यंत्रणा विकसित केली आहे. कंपनीचे संचालक सी. पी. ठक्कर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या यंत्रणेत पाणी शुद्ध करण्यासाठी आठ प्रकारचे फिल्टर बसविण्यात आले आहेत. या तंत्रज्ञानाच्या मदतीने साधारण सहा मिनिटांत १८ लिटर पाणी शुद्ध केले जाते. शुद्ध केलेले पाणी शॉवरद्वारे स्नानासाठी उपलब्ध करून दिले जाते. यंत्रणेची उभारणी, देखभाल-दुरुस्ती आणि आवश्यक मनुष्यबळाची व्यवस्था संबंधित कंपनीकडून केली जाते.

या सुविधेचा ज्येष्ठ नागरिक, लहान मुले तसेच नदीच्या पाण्यात उतरून स्नान करणे शक्य नसलेल्या भाविकांना विशेष लाभ होत आहे. महिला भाविकांसाठी कपडे बदलण्याची स्वतंत्र व्यवस्थाही करण्यात आली आहे. धार्मिक श्रद्धा जपत भाविकांना स्वच्छ पाण्याने स्नानाची सुविधा उपलब्ध करून देणे आणि घाटावरील गैरसोय कमी करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सांगितले.



# अतिक्रमण तात्काळ हटविण्याबाबत ग्रामपंचायत ची नोटीस

## अन्यथा नियमानुसार तात्काळ कडक कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील येमाई गावातील सार्वजनिक रस्ते व शासकीय जागांवरील अतिक्रमण हटविण्याबाबत कवठे येमाई ग्राम पंचायतीने नागरिकांना नोटीस दिली आहे.आज दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी ग्रामपंचायतीच्या वतीने ही सूचना (दवंडी) देण्यात आली असून, संबंधित नागरिकांनी अतिक्रमण स्वतःहून काढून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ग्रामपंचायतीच्या नोटिशीनुसार, गावातील विविध भागांमध्ये रस्त्यांवर तसेच सार्वजनिक वापराच्या जागांवर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे.प्राप्त माहिती नुसार ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने संबधीत गटाची मोजणी २९ तारखेला होणार असून कोणी ही अतिक्रमण करू नये अन्यथा कडक कारवाईस सामोरे जाण्याचा इशारा ग्रामपंचायतीच्या



वतीने देण्यात आला आहे. संबंधित ठिकाणांचा उल्लेख करण्यात आला आहे. रस्ते व सार्वजनिक जागा मोकळ्या ठेवण्याच्या दृष्टीने ही कारवाई प्रस्तावित असल्याचे नोटिशीत नमूद आहे.संबंधित नागरिकांनी आपल्या हद्दीतील अतिक्रमण तातडीने हटवून ग्रामपंचायतीला सहकार्य करावे. अन्यथा अतिक्रमण हटविण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत नियमानुसार कडक व तात्काळ कारवाई करण्यात येऊ शकते, असा इशाराही देण्यात आला आहे.

सार्वजनिक रस्ते मोकळे ठेवण्याचे आवाहन

गावातील रस्ते वाहतुकीसाठी खुले राहावेत आणि सार्वजनिक जागांचा वापर सुरळीत व्हावा, यासाठी नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासक विस्तार अधिकारी बी आर गावडे,ग्राविकास अधिकारी पूनम थोरात चितलकर व ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे.

### संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी त्रैमासिक कृती आराखडा तातडीने सादर करा- अमित पाथरवट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्यातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन पुणे जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी आगामी कालावधीतील संभाव्य पाणीटंचाई निवारणाचा त्रैमासिक कृती आराखडा तातडीने सादर करावा, असे निर्देश पुणे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमित पाथरवट यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. राज्यात दरवर्षी उद्भवणाऱ्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत शासनाने कायमस्वरूपी आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशानुसार पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक उपाययोजना दरवर्षी ३० जूनपर्यंत राबविण्यात येतात.पिण्याच्या पाण्याची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजनांचे नियोजन वेळेत पूर्ण करणे आणि नागरिकांना पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाने दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार ऑक्टोबर ते डिसेंबर २०२६, जानेवारी ते मार्च २०२७ आणि एप्रिल ते जून २०२७ या तीन त्रैमासिक कालावधींसाठी संभाव्य पाणीटंचाई निवारणाचा कृती आराखडा तयार करण्याबाबत शासनाने सूचना दिल्या आहेत. संबंधित गटविकास अधिकारी, पंचायत समित्या तसेच ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग आणि यांत्रिकी विभागातील अधिकाऱ्यांनी संभाव्य पाणीटंचाई निवारणाचा आराखडा तातडीने सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आई वडीलांच्या विश्वासाला तडा जाऊ देऊ नका : साहाय्यक पो.नि. मुटेकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**ढोरजळगांव :** प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जीवनात आई वडील हे प्रथम गुरू आसतात त्यांच्या आत्मसन्मानाला तडा जाणार नाही असे वर्तन आपल्या जीवनात करणे गरजेचे असुन मुलींनी आपल्या आई वडीलांना पासुन कुठलीही गोष्ट लपवता कामा नये आपण शाहु ,फुले, आंबेडकर, जिजाऊंच्या विचारांच्या महाराष्ट्रात राहत असुन कुठल्याही मुलीने स्वतःहाला हतबल समजु नका सावित्रीबाई फुले योजना शासनाच्या वतीने का सुरू करण्यात आली हे प्रत्येक विद्यार्थाने लक्षात घेणे गरजेचे असुन प्रत्येक विद्यार्थ्यीनीला चांगला वाईट स्पर्श ओळखता आला पाहिजे आई वडीलांच्या विश्वासाला तडा जाऊ देऊ नका. शालेय मुलींची छेडछाड कराल तर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा साहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर मुटेकर यांनी बोलताना दिला.

ढोरजळगांव येथील श्रीराम विद्यालयात आयोजित विद्यार्थी सुरक्षा कायदेविषयक मार्गदर्शन शिबीराप्रसंगी मुटेकर बोलत होते.यावेळी बापूसाहेब पाटेकर, प्राचार्य संजय चेमटे,आनंता ऊकीडे, महादेव पाटेकर, पो.काँ संतोष वाघ ,डॉ देविदास देशमुख,जयदीप लबडे आदीसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.मुटेकर पुढे बोलताना म्हणाले की प्रत्येक विद्यार्थ्यांने स्व:ताच्या मनामध्ये आपण करत असलेल्या कामाबद्दल आत्मचिंतन करा क्षणीक सुखाच्या पाठीमागे न पळता थोर विचारवंताचा आदर्श घ्या पोस्को कायद्या अंतर्गत अल्पवयीन मुलीवर अत्याचाराच्या गुन्ह्यात वीस वर्षांपर्यंत शिक्षा होते हे मुलांनी लक्षात घेणे गरजेचे असुन कुठल्याही निर्णय विचारपूर्वक घेऊन पालकांनी आपल्या पाल्याशी संवाद ठेवा.मुली शिकल्या शिवाय देशाची प्रगती होणार नाही. यावेळी सुरेखा शेलार, सुरेश तेलोरे, सुधाकर आल्हाट तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य संजय चेमटे यांनी तर सूत्रसंचालन ईश्वर वाबळे यांनी मानले.

कायद्याने शिक्षण घेण्याचा हक्क जसा मुलींना दिला आहे तसा स्व स्वरंक्षणाचा हक्कही देण्यात आला असून आबासाहेब काकडे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुरू केलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले असून शिक्षकांचे मनोबल वाढविले तर भविष्यात चांगली सुसंस्कृत पिढी घडण्यास निश्चित मदत मिळेल असे पाटेकर यांनी बोलताना सांगितले.

# कांबीतील सिद्धार्थ बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने मागणी करताच नागरिकांना मिळाला मजुरीचा आधार



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** संपूर्ण राज्यात पावसाळ्याच्या चालू हंगामात हुलकावणी दिली असून त्यामुळे सिंचन क्षेत्रासह जनावराच्या चाऱ्याचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा निर्माण झाला असल्याने राज्यात २८५ तालुक्यात शासनाने दुष्काळ जाहीर करून वेग - वेगळ्या उपाय योजना हाती घेतल्या असतानाच शेवगाव तालुक्यातील मराठवाड्याच्या सरहद्दीवर असलेल्या कांबी गावातील गोर - गरीब मजुरांना काम नसल्याने दुष्काळाशी मोठ्या प्रमाणात सामना करावा लागत असल्याचे लक्षात येताच येथील सिद्धार्थ बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने वसंत बाबुराव साबळे व संतोष भुजंग पटवेकर यांनी गावातील मजुरांच्या हाताला काम मिळावे म्हणून मजुरांच्या यादीसह संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करून त्याचा पाठपुरावा केला असल्यामुळे कांबी गावातील मजुरांच्या हाताला काम मिळाले असून काल सोमवार दि.१९ पासून कांबी ते मुंगी या शिवेवरील असणाऱ्या जुन्या मार्गाचे कामास ग्रामपंचायतीमार्फत ग्रामपंचायतीचे प्रशासक महादेव भोसले ग्रामविकास अधिकारी बळीद व ग्रामरोजगार सेवक पिनु नरके यांनी प्रत्यक्ष सुरुवात झाली असल्याने काम करणाऱ्या मजुरांनी सिद्धार्थ बहुउद्देशीय संस्थेचे आभार मानले आहेत.

## द•ख•ल

### डमाळ यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**एरंडगाव :** शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, एरंडगाव समसूद ता. शेवगाव येथील शिक्षक गणेश काकासाहेब डमाळ यांना अस्पायर फाउंडेशनच्या वतीने आयोजित



राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे. या पुरस्कारामुळे एरंडगाव समसूद परिसरातील शैक्षणिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिक्षण क्षेत्रात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांचे योगदान मोलाचे असते. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे आणि त्यांना प्रगतीच्या दिशेने मार्गदर्शन करणे, ही शिक्षकांची महत्त्वाची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर गणेश डमाळ यांना जाहीर झालेला राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव मानला जात आहे. अस्पायर फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणाऱ्या या पुरस्कारामुळे शिक्षकांच्या शैक्षणिक कार्याला प्रोत्साहन मिळणार असून, इतर शिक्षकांनाही प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. गणेश काकासाहेब डमाळ यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शैक्षणिक, सामाजिक व विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षकवृंद, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### समृद्धी जरे हिची शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएससाठी निवड



**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी तथा श्री क्षेत्र भावी निमगाव येथील कु. समृद्धी संदीप जरे हिची बीएसपी (इडझ) अंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस (चइइड) वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने पालक डॉ. संदीप जरे यांच्या उपस्थितीत समृद्धीचा सन्मान करण्यात आला. समृद्धीने मिळवलेल्या या यशामुळे तिच्या कुटुंबीयांसह विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिच्या यशाचे कौतुक करून विद्यालयातील शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी तिचे अभिनंदन केले. या प्रसंगी डॉ. संदीप जरे आणि कु. समृद्धी जरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर आपले ध्येय साध्य करावे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. मच्छिंद्र पानकर, समन्वयक प्रा. बाळासाहेब मंडलिक यांच्यासह शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मकरंद बारगुजे यांनी केले.

### श्रीगोंद्यात २७ ऑक्टोबरला महसूल लोक अदालत

**श्रीगोंदा :** जमिनीच्या वादांमुळे वर्षानुवर्षे महसूल कार्यालयांचे उंबरठे झिजवणाऱ्या पक्षकारांसाठी दिलासादायक बातमी आहे. प्रलंबित महसुली प्रकरणांचा जलदगतीने आणि सामंजस्याने निपटारा करण्यासाठी



श्रीगोंदा तहसील कार्यालयामार्फत 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत मंगळवार, २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत तहसील कार्यालयात लोक अदालत आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार हे अभियान १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या उपक्रमातून जमिनीशी संबंधित प्रलंबित महसुली दावे निकाली काढण्यावर भर देण्यात येणार आहे. लोक अदालत अभियानात सहभागी होण्यासाठी संबंधित पक्षकारांनी २३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. या लोक अदालतीत कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमांतर्गत प्रकरणे, मामलतदार न्यायालय अधिनियमांतर्गत दावे, वारस नोंदी, अधिकार अभिलेखासंबंधित प्रकरणे, ज्येष्ठ नागरिकांच्या निर्वाह व कल्याण अधिनियमांतर्गत प्रकरणे तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमांतर्गत वाटपाची प्रकरणे विचारात घेतली जाणार आहेत. आपापसांतील सहमतीने व सामंजस्याने वाद मिटवून प्रकरणांचा जलद निपटारा करण्याची संधी या अभियानातून उपलब्ध होणार आहे. त्यामुळे संबंधित पक्षकारांनी निर्धारित मुदतीत अर्ज करून लोक अदालत अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीगोंदा तहसीलदारांनी केले आहे.

# नवजीवन विद्यालयात गणित-विज्ञान प्रदर्शन व रांगोळी स्पर्धा



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सेवा संकल्प अभियानांतर्गत शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी शालेय स्तरावरील गणित-विज्ञान प्रदर्शन तसेच भौमितिक व विज्ञानविषयक रांगोळी स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. या प्रदर्शनात इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी गणित व विज्ञान विषयांतील एकूण १५७ मॉडेल्स साकारून आपल्या कल्पकतेचे आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे दर्शन घडविले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्युनिअर कॉलेजचे समन्वयक प्रा. बाळासाहेब मंडलिक होते. मान्यवरांच्या हस्ते गणित-विज्ञान प्रदर्शनाचे व रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भाऊसाहेब गवळी, राजमल फुलभाटी, अमोल नलावडे, विठ्ठल बावणे, श्रीमती सपकाळ मॅडम, श्रीमती शेख मॅडम आणि मनोज परदेशी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश खैरे यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी विद्यालयाचे उपप्राचार्य जयराम नांगरे, पर्यवेक्षक मच्छिंद्र पानकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शिक्षकांच्या वतीने राजेंद्र पानगव्हाणे यांनी मनोगत व्यक्त केले. गणित-विज्ञान प्रदर्शनासाठी परीक्षक म्हणून डॉ. गायके, प्रा. शेलार, प्रा. मोटकर, प्रकाश मरकड, प्रा. निळ आणि मोहिटे यांनी काम पाहिले. तर रांगोळी स्पर्धेसाठी लांडे, ढगे, काळे, कदम, थोरात, धीमते आणि गिरम मॅडम यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. या उपक्रमाचे चित्रीकरण गणेश पवार यांनी केले.

# ठेवीदारांचे पैसे अडकलेच! साईसेवा प्रकरणात प्रशासन नेमके करतेय काय?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** ठेवीदारांचे पैसे अडकून वर्ष उलटले, मग प्रशासनाच्या हालचालींचा उपयोग काय? आयुष्यभर घाम गाळून जमवलेली पुंजी, मुलांच्या शिक्षणासाठी केलेली बचत, मुला-मुलींच्या लग्नासाठी साठवलेली रक्कम आणि उतारवयाचा आधार म्हणून ठेवलेले पैसे आजही मिळत नसल्याने साईसेवा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी आणि साईसेवा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या ठेवीदारांचा संयम सुटू लागला आहे. वर्षभरापासून ठेवीदार आपल्या पैशांसाठी दारोदारी फिरत आहेत; मात्र त्यांच्या हातात रक्कम पडलेली नाही. अधिकारी बदलले, प्रशासक बदलले, ऑडिटर बदलले; पण ठेवीदारांच्या आयुष्यातील आर्थिक संकट संपले नाही. मग या बदलांचा ठेवीदारांना नेमका फायदा काय? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

**स्वतःचे पैसे मिळवण्यासाठी ठेवीदारांची फरफट!**

कुणी मुलांच्या शिक्षणासाठी पैसे ठेवले, कुणी मुलीच्या लग्नासाठी, तर कुणी आयुष्याच्या संध्याकाळी कोणापुढे हात पसरण्याची वेळ येऊ नये म्हणून आयुष्यभराची कमाई संस्थांमध्ये जमा केली. मात्र, आज त्याच पैशांसाठी ठेवीदारांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. निवेदने द्यायची, अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करायचा, नव्या आशेने कार्यालयात जायचे आणि पुन्हा निराश होऊन घरी परतायचे, हेच त्यांच्या वाट्याला आले आहे.

विशेष म्हणजे, ठेवीदारांना त्यांच्या ठेवींबाबत नेमकी किती प्रगती झाली, परतफेड कधी सुरू होणार आणि त्यासाठी कोणती कार्यवाही बाकी आहे, याची स्पष्ट व कालबद्ध माहिती मिळणे आवश्यक आहे. मात्र, वर्ष उलटूनही परतफेडीची निश्चित दिशा स्पष्ट होत नसल्याने ठेवीदारांच्या मनातील प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे.

**खुर्च्या बदलल्या, पण ठेवीदारांचे नशीब बदलले नाही!**

या प्रकरणात प्रशासकीय अधिकारी बदलले, प्रशासक बदलले आणि ऑडिटरही बदलले. प्रत्येक बदलानंतर ठेवीदारांच्या मनात आशेचा किरण निर्माण झाला. आता तरी आपल्या पैशांचा प्रश्न मार्गी लागेल, अशी अपेक्षा होती. परंतु, प्रत्यक्ष परतफेडीबाबत ठोस दिलासा मिळत नसल्याने ही आशा आता संतापात बदलत आहे.

प्रशासकीय यंत्रणेत बदल होत असताना ठेवीदारांच्या प्रश्नावर ठोस निर्णय का होत नाही? परतफेडीची प्रक्रिया नेमकी कुठे अडली आहे? जबाबदारी निश्चित कोणाची? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने देण्याची वेळ आली आहे. ठेवीदारांना केवळ प्रक्रिया सुरू असल्याचे सांगून चालणार नाही; त्यांना प्रत्यक्ष कार्यवाही आणि स्पष्ट कालमर्यादा हवी आहे.

ठेवीदारांच्या कृती समितीचे अध्यक्ष सारंग पाचपुते यांनी या परिस्थितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

आम्हाला आता कोण प्रशासक येणार, कोण अधिकारी बदलणार किंवा कोण ऑडिटर नियुक्त होणार, याच्याशी काही देणेघेणे राहिलेले नाही. आम्हाला आमचे कष्टाचे पैसे परत मिळाले पाहिजेत, एवढीच आमची अपेक्षा आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली. ठेवीदारांच्या या भूमिकेतून प्रशासनाप्रती वाढत चाललेली नाराजी स्पष्ट होत आहे. वर्षभराचा कालावधी कमी नाही. या काळात अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे ठेवीदारांच्या प्रश्नाकडे केवळ प्रशासकीय प्रक्रिया म्हणून न पाहता, त्यांच्या आर्थिक सुरक्षिततेचा प्रश्न म्हणून पाहण्याची गरज आहे. साईसेवा मल्टिस्टेट आणि साईसेवा ग्रामीण पतसंस्थेच्या ठेवीदारांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने दोन्ही संस्थांची आर्थिक स्थिती, उपलब्ध मालमत्ता, देणी आणि सुरू असलेल्या कायदेशीर प्रक्रियेबाबत स्पष्ट माहिती द्यावी. आवश्यक लेखापरीक्षण व कायदेशीर प्रक्रिया वेगाने पूर्ण करून, कायद्यानुसार ठेवीदारांच्या रकमेच्या परतफेडीसाठी ठोस कृती आराखडा आणि कालमर्यादा जाहीर करावी, अशी मागणी होत आहे.

# रायगव्हाणच्या भवानी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील रायगव्हाण येथील जागृत देवस्थान आणि नवसाला पावणारी आई जगदंबा तथा तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्रोत्सवाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी नवरात्रोत्सवाच्या सातव्या माळेनिमित्त देवीच्या दर्शनासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. रायगव्हाण पंचक्रोशीसह श्रीगोंदा तालुक्यातील विविध गावांमधून भाविकांनी येऊन देवीचे मनोभावे दर्शन घेतले. या दिवशी सुमारे ५० हजारांहून अधिक भाविकांनी दर्शन घेतल्याची माहिती श्री जगदंबा मंदिर ट्रस्टच्या वतीने देण्यात आली.

रायगव्हाण येथील जगदंबा मातेचे देवस्थान परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून प्रसिद्ध आहे. तुळजापूर येथील जगदंबा मातेचे प्रतिरूप म्हणून या देवीकडे पाहिले जाते. नवसाला पावणारी देवी अशीही मातेची ख्याती असून, विविध शुभकार्यांपूर्वी देवीचा कौल घेण्याची परंपरा आजही भक्तिभावाने जपली जाते.

**तुळजापूरहून पायी ज्योत आणण्याची परंपरा**

नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी गावातील तरुण मंडळी श्रीक्षेत्र तुळजापूर येथून पायी चालत देवीची ज्योत आणतात. नऊ दिवस मंदिर परिसरात देवीचा जागर, धार्मिक विधी आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अनेक भाविक देवीची आराधना करण्यासाठी मंदिर परिसरात मुक्कामी राहतात. यामुळे संपूर्ण नवरात्रोत्सवात परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होते.

नवरात्रोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम, 'खेळ पैठणीचा' तसेच देवीच्या भक्तिगीतांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमांमुळे धार्मिक उत्सवाला सांस्कृतिक रंगतही लाभली आहे. श्री जगदंबा मंदिर ट्रस्ट, रायगव्हाण आणि ग्रामपंचायतीच्या वतीने देवस्थान परिसरात भाविकांच्या सोयीसाठी विविध विकासकामे करण्यात आली आहेत. यामध्ये भोजनकक्ष परिसराचे सुशोभीकरण, पाण्याच्या टाकी , पेव्हर ब्लॉक, दर्शन रांगेची व्यवस्था, शौचालये आणि भक्तनिवास अशा सुविधांचा समावेश आहे.

# न्यू इंग्लिश मिडीयम स्कूल व जुनिअर कॉलेजचे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**निघोज :** विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना प्रोत्साहन देत त्यांच्यात सांघिक भावना, शिस्त आणि जिद्द निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये पठारवाडी येथील बाबासाहेब कवाद ग्रामविकास सेवाभावी संस्था संचलित न्यू इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शाळेच्या १७ वर्षांखालील मुलांच्या व्हॉलीबॉल संघाने, मुलींच्या कबड्डी संघाने आणि मुलांच्या कबड्डी संघाने प्रथम क्रमांक मिळवत शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला.पानोली येथे झालेल्या तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात पठारवाडी येथील न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. या संघाचे नेतृत्व शिवम मेसे याने केले. संघातील खेळाडूंनी उत्कृष्ट समन्वय, चपळता आणि सांघिक खेळाचे प्रदर्शन करत यश संपादन केले.राळेगणसिद्धी येथे आयोजित तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या गटात पठारवाडीच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. अनुष्का सुपेकर हिने संघाचे कर्णधारपद सांभाळले. विजयी खेळाडूंची नावे, व्हॉलीबॉल - १७ वर्षांखालील मुलांचा संघ , कर्णधार शिवम मेसे , कुणाल भोसले, श्रेयश वाफारे, आर्यन निचीत, सोहम लंके, सार्थक सोमवंशी, शौर्य आढाव, तनिष वराळ, शुभम मेसे, आयुष कापसे, नयन निचीत आणि शौर्य पटवा. कबड्डी खेळात १७ वर्षांखालील मुलींचा संघ , कर्णधार अनुष्का सुपेकर, मृणाल बेलोटे, सिद्धी मुळे, अवनी मेसे, वेदिका पठारे, रिद्धी मुळे, समृद्धी गावडे, आदिती बोरकर, श्रावणी पानगे आणि ईश्वरी वेलोटे. तीन संघांचे प्रथम क्रमांकाचे यश हे विद्यार्थ्यांची मेहनत, क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शाळेच्या प्रोत्साहनाचे फलित आहे.

# लोकशाही व संविधान विरोधी धोरणांचा निषेध; तिरंगा रॅली

## लोकशाही व संविधान प्रेमी नागरिक पक्ष व संघटनांचे निवेदन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**पारनेर :** लोकशाही, संविधान आणि नागरिकांच्या घटनात्मक मूलभूत अधिकारांची गळचेपी होत असल्याचा आरोप करत केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदविण्यासाठी पारनेर पोलीस प्रशासनास लोकशाही व संविधान प्रेमी नागरिक पक्ष व संघटनांचे वतीने निवेदन देण्यात आले.

दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी, युवक, बेरोजगार आणि नागरिकांच्या आंदोलनाला पाठिंबा देत आंदोलकांवरील कथित पोलिसी अत्याचारांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९ नुसार नागरिकांना अभिव्यक्तिस्वातंत्र्य, शांततेने एकत्र येण्याचा आणि आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मात्र, सरकारच्या विरोधात आवाज उठविणाऱ्या आंदोलकांना दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. जंतर-मंतर येथील आंदोलनादरम्यान विद्यार्थी, युवती आणि आंदोलनाचे वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांना पोलिसांकडून मारहाण झाल्याचा आरोपही करण्यात आला. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली.निवेदनात निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरचा वापर करावा, मतदारांचा अधिकार बाधित होत असल्याचा आरोप असलेली एसआयआर प्रक्रिया रद्द करावी, शिक्षणाचे बाजारीकरण थांबवावे आणि पेपरफुटीसारख्या प्रकारांना आळा घालण्यासाठी शिक्षण व्यवस्थेत सुधारणा कराव्यात, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कागदपत्रे व ऑनलाइन प्रक्रियेत न अडकवता सरसकट आर्थिक मदत द्यावी, जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली. तसेच शेतमजूर, कामगार आणि बलुतेदारांना आर्थिक मदत देऊन बलुतेदारांची लघुउद्योगांसाठीची कर्जे माफ करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात अंकिता भंडारी प्रकरणाचा उल्लेख करत दुष्यंतकुमार यांच्या राज्यपालपदावरील नियुक्तीबाबतही आक्षेपनोंदविण्यात आला आहे. तसेच आरएसएसवर कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे. शासनाने या मागण्यांची गांभीर्याने दखल घ्यावी; अन्यथा आगामी काळात अधिक तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्य





मा. श्री प्रमोद दादा मोरे
(राज्य अध्यक्ष- निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य)

मा. प्रा. डॉ. अनिल किसन लोखंडे
(राज्य उपाध्यक्ष-निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य)

मा. श्री अर्जुन बी. राऊत
(जिल्हा संघटक-निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य)

- शुभेच्छुक -

मा. श्री बाळासाहेब कडू
(जिल्हा समन्वयक-निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ)

मा.श्रीम. स्वाती अडाणे
(जिल्हा समन्वयक-निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ)

मा. श्री दत्तात्रय लांघी
(जिल्हा कार्यकारणी सदस्य-निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ)

मा. श्री केरू आभाळे
(जिल्हा कार्यकारिणी सदस्य-निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ)

सर्व पदाधिकारी निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ अहिल्यानगर

''आमची शाळा..जिल्हा परिषद शाळा''

## जिल्हा परिषद प्राथ.शाळा

टाकळीभान, ता.श्रीरामपूर
-मुख्याध्यापक-
**मा.श्रीमती प्रियंका शहाणे**
व सन्मा.शिक्षक वृंद

''आमची शाळा..जिल्हा परिषद शाळा''

## जिल्हा परिषद प्राथ.शाळा

**लक्ष्मीवाडी, केंद्र टाकळीभान, ता.श्रीरामपूर**
-मुख्याध्यापक-
**मा.श्री.क्षिरसागर बी.आर.**
व सन्मा.शिक्षक, सेवक वृंद



## मा.श्री.आदिनाथ गिताराम धुमाळ

कृषि सहाय्यक,खिर्डी /टाकळीभान
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर

दै. राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिन हार्दिक शुभेच्छा!

माऊली प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्ट, श्रीरामपूर संचलित

## प्राईड ॲकेडमी

इंग्लिश मिडीयम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज




ज्ञानेश्वर भानुदास मुरकुटे
संस्थापक, माऊली प्रतिष्ठान

डॉ.वंदनाताई मुरकुटे
मा.सभापती, पं.स.श्रीरामपूर
संस्थापक, प्राईड ॲकेडमी

प्राईड ॲकेडमी, वांगी-भेर्डापूर, ता.श्रीरामपूर, मो.७३५०५०१३००
ब्रँच : प्राईड ॲकेडमी प्रि-स्कूल, कारेगाव रोड, टाकळीभान





## मा.श्री.राजेंद्र पा.कोकणे

राष्ट्रवादी किसान सभा उत्तर नगर जिल्हा अध्यक्ष
व मा.उपसरपंच ग्रामपंचायत, टाकळीभान



## न्यू इंग्लिश स्कूल व अण्णासाहेब पटारे पाटील ज्युनिअर कॉलेज, टाकळीभान

ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर
।। स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद ।।
**मा.प्राचार्य आर.एम.शिंदे**
स्थानिक स्कूल कमिटी अध्यक्ष, सदस्य-शिक्षक पालक संघ
सर्व शिक्षणप्रेमी, माजी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद

पंचमहल जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि., गोध्रा संचलित

## साईनाथ दूध संकलन व शितकरण केंद्र

टाकळीभान, ता. श्रीरामपूर



**वैशिष्ट्ये :-**
योग्य दर, योग्य गुणप्रत,
योग्य मोजमाप,
ना नफा ना तोटा तत्वावर,
पशुखाद्य, आकर्षक रिबेट व
बोनस वाटप, सुसज्ज चिलिंग प्लँट

श्री.प्रविण सोमनाथ बनकर चेअरमन
मार्गदर्शक
श्री.पृथ्वीराज नारायण उंदरे व्हा. चेअरमन

## खोकर विविध कार्यकारी सेवा सह.संस्था मर्या; खोकर

ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर




विना सहकार..
नही उद्धार..

श्री.नंदकुमार सावळेराम सलालकर
चेअरमन

श्री.भाऊसाहेब रावसाहेब सिन्नरकर
व्हा.चेअरमन

।। संचालक मंडळ ।।

श्री.बाबासाहेब पंढरीनाथ पटारे
श्री.केशव हरी चव्हाण
श्री.कादर नसीर सय्यद
श्री.शंकरराव पर्वत शेरकर
श्री.ज्ञानेश्वर बाबासाहेब काळे
श्री.संजय नामदेव काळे
श्री.अशोक पुंजाजी कोल्हे
श्री.प्रकाश संपतराव पवार
श्री.बाबासाहेब सुखदेव कचरे
सौ.आशाबाई रावसाहेब चक्रनारायण (सरपंच)
श्री.कृष्णा द्वारकानाथ शिंदे-सचिव



मा.श्री.ज्ञानेश्वर बाबासाहेब पा.काळे
संचालक-अशोक स.सा.का.लि;
स्वि.संचालक-खोकर वि.कार्य.सेवा.संस्था

त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित..

## त्रिमूर्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय घोगरगाव, ता. नेवासा



संस्थापक : मा.स्व.साहेबराव घाडगे पाटील
अध्यक्षा : श्रीमती सुमतीताई घाडगे पाटील
यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी वाटचाल...
प्राचार्य श्री.संतोष जावळे सर
शिक्षक स्टाफ व शिक्षकेतर कर्मचारी वृंद, घोगरगाव, ता.नेवासा









## मा.श्री.किशोर ऊर्फ गणेश भारत छल्लारे

संस्थापक - स्व.ऋषी छल्लारे फाऊंडेशन
अध्यक्ष-जगदंबा युवा प्रतिष्ठान
माजी उपसरपंच-भोकर ग्रा.पं.
मा.चेअरमन-भोकर वि.कार्य.
सेवा संस्था, ता.श्रीरामपूर







## मा.श्री.संतोष (कान्हा) खंडागळे

उपसरपंच ग्रामपंचायत,
टाकळीभान,
* शुभेच्छुक*
ताई प्रतिष्ठाण व
श्री.कान्हा खंडागळे मित्र मंडळ,
टाकळीभान



## जनहितासाठी सदैव तत्पर...



## मा.श्री. दिपक शंकरराव पा.पवार

ग्रामपंचायत सदस्य, प्रभाग क्रमांक १,
टाकळीभान, ता.श्रीरामपूर





## मा.श्री.विलास भाऊसाहेब दाभाडे

संचालक -श्री संत सावता माळी सोसायटी, टाकळीभान,

## श्रीमती विद्याताई भाऊसाहेब दाभाडे

संचालक -कृषी उत्पन्न बाजार समिती, श्रीरामपूर

## मा.श्री. मयूर पा.पटारे

संचालक-कृषी उत्पन्न बाजार समिती, श्रीरामपूर
सदस्य-ग्रामपंचायत, टाकळीभान



## मा.श्री.मंजाबापू पा.थोरात

मा.सदस्य-मुळा प्रवरा
मा.सरपंच-ग्रामपंचायत
टाकळीभान
मा.चेअरमन टा.भान.सोसा.
ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर



दै.राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...

मा.प्राचार्य जयकर पा.मगर (सर)
उपाध्यक्ष-राष्ट्रवादी काँग्रेस श्रीरामपूर तालुका




## मा.श्री.शिवाजीराव गोवर्धन पा.शिंदे

संचालक-अशोक सह.साखर कारखाना,
कारेगाव भाग
मु.पो.टाकळीभान
अध्यक्ष - लोकसेवा विकास आघाडी,
टाकळीभान, ता.श्रीरामपूर




## मा.श्री.नानासाहेब पुंजाजी पा.पवार

माजी सभापती
पंचायत समिती व कृषी उत्पन्न
बाजार समिती, श्रीरामपूर




मा.श्री.बाबासाहेब पा.तनपुरे
मा.चेअरमन-श्री संत सावता माळी वि.का.से.संस्था, टाकळीभान

मा.श्री.श्रीधर गाडे पा.
प्रगतशील शेतकरी, टाकळीभान



## मा.श्री. राहुल पा.पटारे

चेअरमन-टाकळीभान
वि.कार्य.सेवा संस्था
अध्यक्ष-स्थानिक स्कूल कमिटी
टाकळीभान



## मा.श्री.मुकुंद राजाराम पा.हापसे

तालुका उपाध्यक्ष भारतीय
जनता पार्टी,श्रीरामपूर
मु.पो.टाकळीभान




मा.श्री.यशवंत रणनवरे
संचालक-अशोक सह.साखर कारखाना

मा.सौ.अर्चनाताई यशवंत रणनवरे
सरपंच-ग्रामपंचायत टाकळीभान



## मा.श्री. राजेंद्र कृष्णाजी पा.भाड

सचिव-सावित्रीबाई फुले
शिक्षण प्रसारक मंडळ,
टाकळीभान,ता.श्रीरामपूर,
जि.अहिल्यानगर



## मा.श्री.दादासाहेब सुखदेव पा.कापसे

अध्यक्ष-टाकळीभान विकास आघाडी
प्रगतशील शेतकरी, टाकळीभान
ता.श्रीरामपूर

नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

## हॉटेल द्वारका

व्हेज-नॉनव्हेज
जेवणाची उत्तम सोय

प्रोप्रा. सुरज वाघुले
टाकळीभान, ता.श्रीरामपूर मो.९९२१७७२१३०



## मा.श्री. बंडोपंत दिवाणजी बोडखे

तालुका उपाध्यक्ष
राष्ट्रवादी किसान सभा



## मा.श्री. नारायण हरिभाऊ पा.काळे

उत्तर अ.नगर जिल्हा सचिव
भारतीय जनता पार्टी